cmyk

## संपादकीय

### युद्धाच्या ज्वाळांमध्ये जग

''युद्धामध्ये आणि प्रेमामध्ये सर्व काही क्षम्य असते,'' ही म्हण आजच्या जागतिक परिस्थितीकडे पाहता फारच पोकळ वाटू लागली आहे. विशेषतः अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष यांच्या धोरणांमुळे उभ्या राहिलेल्या युद्धजन्य परिस्थितीने या उक्तीची मर्यादा अधोरेखित केली आहे. युद्ध हे कधीच सर्वांसाठी न्याय्य किंवा क्षम्य ठरत नाही; उलट ते मानवी अस्तित्वालाच आव्हान देणारे ठरते, याचे प्रत्यंतर सध्या जगाला येत आहे.


दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

• छत्रपती संभाजीनगर • पुणे • अहिल्यानगर • जालना • धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–१५ | शुक्रवार दि. ०३ एप्रिल २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


## थोडक्यात...

### खानदेशात तापमानाचा पारा ४२ अंशांवर

**जळगाव :** खानदेशात कमाल तापमान सलग दोन दिवस ४२ अंश सेल्सिअसवर राहिले आहे. यामुळे केळी व अन्य फळबागांना फटका बसत आहे. उत्पादनासही यामुळे फटका बसेल, असे दिसत आहे. तापमानात मागील पाच – सहा दिवसांत मोठी वाढ झाली आहे. २२ मार्चपर्यंत कमाल तापमान ३७ ते ३८ अंश सेल्सिअसपर्यंत होते. परंतु सहा ते सात दिवसांत तापमान सतत वाढले असून, पारा आता ४१ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचला आहे. तापमानात काही दिवसांत मोठी वाढ झाल्याने पिकांना फटका बसत आहे. शेतीकामे रखडत सुरू आहेत. ग्रामीण भागात नागरिक दाट झाडांच्या सावलीत दुपारच्या वेळी बसलेले दिसतात. लोकसभा निवडणुकीचे वातावरण एकीकडे तापत असताना दुसरीकडे तापमानांचा उच्चांकही वाढत आहे. मार्चअखेरच तापमानाने उच्चांक गाठण्यास सुरवात केली आहे. मागील वर्षी मार्चअखेरपर्यंत कमाल तापमान ४० अंश सेल्सिअसपर्यंत होते. परंतु यंदा त्यात मोठी वाढ झाली आहे. केळी, पपई, कलिंगड, खरबूज व अन्य पिकांचे सिंचन करण्यासंबंधी शेतकऱ्यांची धावपळ होत आहे. रोज पिकांना दोन ते अडीच तास पाणी द्यावे लागत आहे.

### एलपीजीबाबत खोटे बोलू नका, जनतेला विश्वासात घ्या – राऊत

मुंबई । प्रतिनिधी

पश्चिम आशियातील युद्धामुळे स्वयंपाकाच्या गॅस सिलिंडरच्या उपलब्धतेबाबत केंद्र सरकार खोटे बोलत असल्याचा आरोप ठाकरेसेना नेते संजय राऊत यांनी केला आहे. तसेच, या मुद्द्यावर सरकारने जनतेला विश्वासात घेतले पाहिजे, असेही त्यांनी म्हटले. माध्यमांशी बोलताना राऊत म्हणाले, देशात एलपीजी सिलिंडरचा तुटवडा निर्माण झाला आहे. इंधनाच्या तुटवड्यामुळे पाकिस्तान आणि इतर अनेक देशांमध्ये लॉकडाऊनसारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. केंद्र सरकारवर विश्वास ठेवू नका. ते खोटे बोलत आहेत. एलपीजीचा तुटवडा निर्माण झाला आहे आणि तो असाच कायम राहील.

### नवी मुंबई पालिकेत ५८ व्या वर्षीच निवृत्ती

**मुंबई :** महापालिका कर्मचारी, अधिकाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय ५८ वरून ६० वर्षे करण्याचा नवी मुंबई महापालिकेच्या महासभेचा निर्णय अखेर नगरविकास विभागाने फेटाळला आहे. हा महापालिकेतील सत्ताधारी भाजपला मोठा धक्का मानला जात आहे.

नवी मुंबई महापालिकेच्या २० मार्च रोजी झालेल्या महासभेत आपल्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय ५८ वरुन ६० वर्षे करण्याचा ठराव मंजूर केला होता. याबाबत पालिका सचिवांनी तसा अध्यादेशही काढला होता.या निर्णयाचा सताधाऱ्यांनी मोठा गाजावाजाही केला. मात्र हा ठराव अशासकीय असल्याने शासनाची मंजुरी आवश्यक होती. यामुळे २७ मार्च रोजी महापालिका आयुक्तांनी तो राज्य सरकारच्या मान्यतेसाठी नगरविकास विभागाकडे पाठवला होता, मात्र नगरविकास विभागाने हा प्रस्ताव फेटाळला आहे. त्यामुळे महापालिकेतील अधिकारी, कर्मचारी यांचे निवृत्तीचे वय ५८ वर्षेच असणार आहे.

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.३० मार्च २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: २५६.०० क्विंटल | १,९२३ | २,६०१ | २,२४४ |
| ज्वारी/हायब्रिड: १६१.५० क्विंटल | १,७०० | ४,२०० | ३,२१७ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : १.०० क्विंटल | ६,५०० | ७,००० | ६,७५० |
| उडीद : २.५० क्विंटल | ६,३५४ | ६,३५४ | ६,३५४ |
| बाजरी:५५.०० क्विंटल | २,४०० | २,७५० | २,६३९ |
| मुग: २.०० क्विंटल | ७,८०० | ७,८०० | ७,८०० |
| सोयाबीन: १८.५० क्विंटल | ५,५०० | ५,५०० | ५,५०० |
| हरभरा: २१.०० क्विंटल | ४,९०० | ५,०५० | ४,९९८ |

# नुकसानीच्या सर्वेक्षणानंतरच शेतकऱ्यांना मदत !

## महसूलमंत्री बावनकुळे यांची माहिती; अवकाळी, गारपीटने शेतकरी हतबल

नागपूर । प्रतिनिधी

**उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात अवकाळी पावसामुळे पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. मुख्यमंत्र्यांनी संपूर्ण सर्वेक्षणाचे आदेश दिले असून, अहवालानंतर नुकसान भरपाई देण्याबाबत निर्णय घेतला जाईल, अशी माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी गुरुवारी (दि. २ एप्रिल) नागपूरमध्ये बोलताना दिली. मंत्रिमंडळ बैठकीतही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत मुख्य सचिवांना आदेश दिले आहेत. सर्वेक्षण करुन शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यासाठी शासन निर्णय घेईल, असेही ते म्हणाले.**



राज्यातील अनेक भागात अवकाळी पाऊस आणि गारपिटीचा तडाखा बसला. यामुळे गहू, मका आणि ज्वारीचे उभे पीक आडवे झाले. कांदा, टोमॅटोचेही नुकसान झाले आहे. यामुळे शेतकरी हतबल झाला असून त्याच्याकडून भरपाईची मागणी केली जात आहे. दरम्यान, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी, खरीप हंगाम २०२६ च्या पार्श्वभूमीवर राज्यातील खतांची उपलब्धता आणि नियोजनासंदर्भात सविस्तर आढावा घेण्यासाठी मंत्रालयात बुधवारी बैठक घेतली. या बैठकीत युरिया आणि डीएपी खतांचा एप्रिल मे महिन्यात पुरेसा आरक्षित साठा तयार ठेवण्याचे तसेच तालुकानिहाय नियोजन करून खतांचे वेळेवर वितरण करण्याचे त्यांनी निर्देश दिले आहेत. खत वितरण प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि शिस्तबद्ध राहावी यासाठी पॉस मशीनद्वारे रिअल टाईम विक्री, जिल्हानिहाय वाटपाचे काटेकोर पालन आणि साठा व्यवस्थापनाबाबतही त्यांनी स्पष्ट सूचना दिल्या असल्याचे त्यांनी म्हटले आहे. तसेच कोणत्याही विक्रेत्याने खतांसोबत इतर उत्पादने घेण्याची सक्ती करू नये, अन्यथा कडक कारवाई करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

शेतकऱ्यांना वेळेवर व पुरेसा खत पुरवठा मिळावा, यासाठी शासन पूर्णपणे कटिबद्ध असून यंत्रणा सज्ज ठेवण्यावर भर देण्यात आला, असे त्यांनी नमूद केले.

## आयएएस तुकाराम मुंडे यांना मातृशोक

मुंबई । प्रतिनिधी

वरिष्ठ सनदी अधिकारी तुकाराम मुंढे यांच्या आईचं निधन झालं आहे. आयएएस तुकाराम मुंढे यांच्या आई आसराबाई हरिभाऊ मुंढे यांचं पुण्यात निधन झालं. त्यांचं पार्थिव बीडच्या ताडसोना या मूळगावी नेण्यात येणार आहे. आसराबाई यांच्या पार्थिवावर ३ एप्रिल रोजी सकाळी नऊ वाजता त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे.



तुकाराम मुंढे हे सध्या पश्चिम बंगालच्या निवडणुकीच्या कर्तव्यावर आहे. तुकाराम मुंढे यांच्या आई आसराबाई यांचं वय जवळपास शंभरच्या आसपास होते, अशी माहिती त्यांच्या कुटुंबीयांनी दिली.तुकाराम मुंढे यांच्या आईचे निधन झाल्याने प्रशासकीय वर्तुळात शोककळा पसरली आहे. सोशल मीडियावर कुटुंबीय, नातेवाईक आणि गावक–यांनी आसराबाई मुंडे यांच्या स्मृतींना आदरांजली वाहिली आहे.आईच्या

# ८२९ शाळांची मान्यता रद्द होणार ?

## सरकारने काढला थेट आदेश, वारंवार अपात्र ठरणाऱ्या शाळा टार्गेटवर

मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांच्या वेतन अनुदान प्रक्रियेबाबत महत्त्वाचा शासन निर्णय समोर आला आहे. कायम विना अनुदानित तत्त्वावर मान्यता असलेल्या आणि 'कायम' शब्द वगळलेल्या शासनमान्य खासगी शाळा व तुकड्यांना निकषानुसार मूल्यांकन करून टप्प्याटप्प्याने वेतन अनुदान देण्याचे राज्य सरकारचे धोरण आहे. मात्र, निकषांनुसार वारंवार मूल्यांकन करूनही सतत अपात्र



ठरणाऱ्या शाळांबाबत आता सरकारने कठोर पाऊल उचलले आहे.

यापूर्वीच अशी तरतूद करण्यात आली होती की, एखादी शाळा ( ) सलग तीन वर्षे मूल्यांकनात अपात्र ठरल्यास तिची परवानगी किंवा मान्यता आपोआप रद्द होईल. तरीही आतापर्यंत अशा शाळांना वारंवार मूल्यांकनाची संधी देऊनही त्यांची मान्यता रद्द करण्याची कारवाई करण्यात आली नव्हती. आता मात्र राज्य सरकारने या प्रक्रियेला ◀◀ पान २ वर

### पालक – विद्यार्थी अडचणीत येणार


या निर्णयामुळे संबंधित शाळांमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना आणि त्यांच्या पालकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागू शकतो. शाळा बदलल्याने विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम, शिक्षक आणि शैक्षणिक वातावरणात बदल होण्याची शक्यता आहे. अनेक शाळा आर्थिकदृष्ट्या कमकुवत असल्याने स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर चालवणे त्यांच्यासाठी मोठे आव्हान असणार आहे.

## शक्तिपीठ महामार्गाचा आराखडा पुन्हा बदलला

मुंबई । प्रतिनिधी

गेल्या काही काळापासून वादाचा मुद्दा राहिलेल्या शक्तिपीठ महामार्गाच्या आरेखनात पुन्हा बदल करण्यात आला आहे. पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यांतून जाणारा हा मार्ग आता सातारा जिल्ह्यातूनही जाणार आहे. त्यामुळे ८०२ किलोमीटरच्या या मार्गाची लांबी आता ८५६ किलोमीटरवर गेली आहे.

नागपूर–गोवा शीघ्रसंचार द्रुतगती महामार्ग म्हणजेच महाराष्ट्र शक्तिपीठ महामार्गाच्या आखणीला फेब्रुवारी २०२४मध्ये मान्यता देण्यात आली होती. या आखणीनुसार महामार्गासाठी महाराष्ट्र ◀◀ पान २ वर



**मूळ मंजूर आखणीपैकी वर्धा, यवतमाळ, बीड व लातूर या जिल्ह्यांमधील आखणी कायम ठेवून नांदेड, हिंगोली, परभणी, धाराशिव, सोलापूर, सांगली, कोल्हापूर, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमधील मूळ मंजूर आखणीमध्ये सुधारणा करून आणि सातारा जिल्ह्यामधील आखणीचा नव्याने अंतर्भूत करून, महाराष्ट्र शक्तिपीठ महामार्ग दिग्रज (ता. जि. वर्धा) ते बांद्यापर्यंत (ता. सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग) सुधारित आखणीस मान्यता देण्यात आली आहे.**

## होर्मुझ सामुद्रधुनी सुरळीत करण्यासाठी ब्रिटनचा पुढाकार ; चर्चेसाठी भारतालाही निमंत्रण

नवी दिल्ली । वृत्तसेवा

संपूर्ण जगाचे लक्ष वेधलेल्या होर्मुझ सामुद्रधुनीतील तणाव निवळण्यासाठी आणि व्यापार मार्ग पुन्हा सुरळीत करण्यासाठी ब्रिटनने पुढाकार घेतला आहे. यासंदर्भात चर्चा करण्यासाठी ब्रिटनने भारतासह अनेक देशांना निमंत्रित केले असून, परराष्ट्र सचिव विक्रम मिसरी उच्चस्तरीय बैठकीत भारताचे प्रतिनिधित्व करणार असल्याची माहिती परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जैस्वाल यांनी गुरुवारी ( दि. २) या पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.




मध्यपूर्वेतील संघर्षामुळे जागतिक ऊर्जा पुरवठ्यावर परिणाम होत आहे. ही परिस्थिती लक्षात घेता, भारतानेही या भागात आपली सक्रियता वाढवली आहे. भारतीय जहाजांची वाहतूक विनासायास आणि सुरक्षित व्हावी, यासाठी भारत इराणसह संबंधित प्रादेशिक देशांशी सातत्याने संवाद साधत आहे. जैस्वाल यांनी सांगितले की, ''आम्ही इराण आणि ◀◀ पान २ वर

## खुनी सुधारू शकतो ; पण सायबर गुन्हेगारांना क्षमा नको - सरन्यायाधीश

दिल्ली । वृत्तसंस्था

एखादा खुनी सुधारू शकतो आणि त्याला सुधारण्याची संधी दिली जाऊ शकते, परंतु सायबर गुन्हेगारांना अजिबात सोडू नये. अशा गुन्हेगारांना क्षमा नको, त्यांना मोबाईल फोन किंवा इतर कोणत्याही तंत्रज्ञानाचा वापर करण्यापासून पूर्णपणे रोखून, त्यांना स्वतंत्र कोठडीत ठेवणे हाच एकमेव मार्ग आहे. या गुन्हेगारांना हाताळण्याचा हाच सर्वोत्तम पर्याय आहे,'' अशी अत्यंत कडक टिप्पणी एका सायबर गुन्ह्याच्या सुनावणीदरम्यान सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी गुरुवारी (दि.२) केली.



सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमल्य बागची आणि न्यायमूर्ती विपुल पांचोली यांच्या खंडपीठासमोर फसवणूक प्रकरणातील आरोपी सूरज श्रीवास्तव याच्या जामीन अर्जावर सुनावणी झाली. अलाहाबाद उच्च न्यायालयाने त्याचा जामीन फेटाळला होता, त्या आदेशाला त्याने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. जामीन अर्जावर सुनावणी करताना सरन्यायाधीश सूर्य कांत म्हणाले, ''एखादा खुनी सुधारू शकतो आणि त्याला सुधारण्याची संधी दिली जाऊ शकते, परंतु सायबर गुन्हेगारांना अजिबात सोडू नये. अशा गुन्हेगारांना क्षमा नको, त्यांना मोबाईल फोन किंवा इतर कोणत्याही तंत्रज्ञानाचा वापर करण्यापासून पूर्णपणे रोखून, त्यांना स्वतंत्र कोठडीत ठेवणे हाच एकमेव मार्ग आहे. ◀◀ पान २ वर

## चॅट जीपीटी तुमच्या मेंदूला करतेय कमकुवत

नवी दिल्ली । वृत्तसेवा

आर्टिफिशियल इंटेलिजन्स(एआय) संदर्भात फेडरल युनिव्हर्सिटी ऑफ रिओ डी जानेरोच्या नवीन अभ्यासानुसार, चॅट जीपीटीसारख्या एआय टूल्सचा वापर तुमच्या मेंदूवर परिणाम करू शकतो. प्रत्येक गोष्टीसाठी एआय टूल्सवर अवलंबून राहिल्यामुळे मेंदूची लक्षात ठेवण्याची क्षमता कमी होऊ शकते. याशिवाय तुमची कल्पक विचारसरणी देखील मर्यादित होऊ शकते. या रिसर्चमध्ये असे दिसून आले आहे की, जे विद्यार्थी पूर्णपणे चॅट जीपीटीवर अवलंबून होते, त्यांच्या मेंदूची सक्रियता सर्वात कमी होती. चॅट जीपीटी वापरणा–या विद्यार्थ्यांच्या तुलनेत, तंत्रज्ञानाशिवाय स्वतः काम करणा–या मुलांचा मेंदू जास्त सक्रिय होता. चॅट जीपीटीसारखी एआय टूल्स आपल्या मदतीसाठी आहेत, परंतु त्यांच्यावर वाढतं अवलंबित्व आपल्या स्मरणशक्तीला आणि सर्जनशीलतेला हानी पोहोचवत आहे. विशेषतः शालेय विद्यार्थ्यांसाठी हे धोकादायक ठरू शकते. अभ्यासादरम्यान ◀◀ पान २ वर

## खरातविरोधात 'विशेष सरकारी वकील' म्हणून काम करण्याची तयारी – ॲड. असीम सरोदे

पुणे । प्रतिनिधी


१ एप्रिल रोजी पार पडलेल्या सुनावणीत नाशिक जिल्हा न्यायालयाने अशोक खरातला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावणी आहे. त्यानुसार त्याची रवानगी पोलीस कोठडीतून न्यायालयीन कोठडीत करण्यात आली आहे.


या प्रकरणाची व्याप्ती खूप मोठी आहे. अनेकांचे पाय खरातसोबत अडकू शकतात. अनेकांची नावे समोर येत आहेत. त्यामुळे हे प्रकरण अत्यंत चर्चेतील प्रकरण आहे. एसआयटीकडून अशोक खराताची चौकशी केली जात आहे. अनेकांचे जबाब नोंदवण्याचे काम सुरू आहे. खरात विरोधात आणखी माहिती घेतली जात आहे. एसआयटीने शिर्डी जमीन प्रकरणात चौकशीसाठी अशोक खरातची पत्नी कल्पना खरात हिला ताब्यात घेण्यासाठी घरी गेले होते. पण ती पसार झाली असून, अशोक खराताच मुलगा हर्षवर्धन खरात याला पोलिसांनी ◀◀ पान २ वर

## ४० वस्तू स्वस्त;शॅम्पू, दुधाची पिशवी ते औषध कस्टम ड्युटी हटवली

मुंबई । प्रतिनिधी

कच्च्या तेलाच्या पुरवठ्यातील या व्यत्ययामुळे अनेक देशांमध्ये पेट्रोल आणि एलपीजीचा तुटवडा निर्माण झाला आहे. वाढत्या खर्चामुळे खासगी कंपन्यांनी तेलाच्या किमती वाढवल्या आहेत. कच्च्या तेलाच्या किमतीमुळे तेल कंपन्यांचा खर्च वाढला आहे. हा भार सर्वसामान्यांवर पडू नये, यासाठी सरकारने पेट्रोल आणि





डिझेलवरील उत्पादन शुल्क प्रति लिटर १० रुपयांनी कमी केले आहे. आता, सर्वसामान्यांना दिलासा देण्यासाठी सरकारने पेट्रोकेमिकल उत्पादनांवरील आयात शुल्क कमी केले आहे.

अर्थ मंत्रालयाने जारी केलेल्या अधिसूचनेनुसार, ४१ अत्यावश्यकपेट्रोकेमिकल वस्तूंवरील सीमा शुल्क पूर्णपणे माफ करण्यात आले आहे. ही सूट २ एप्रिल २०२६ पासून लागू झाली असून ती ३० जून २०२६ पर्यंत लागू राहील. ◀◀ पान २ वर

cmyk

cmyk



## अग्रलेख

# युद्धाच्या ज्वाळांमध्ये जग; हट्ट, हानी आणि मानवतेचा प्रश्न

''युद्धामध्ये आणि प्रेमामध्ये सर्व काही क्षम्य असते,'' ही म्हण आजच्या जागतिक परिस्थितीकडे पाहता फारच पोकळ वाटू लागली आहे. विशेषतः अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष यांच्या धोरणांमुळे उभ्या राहिलेल्या युद्धजन्य परिस्थितीने या उक्तीची मर्यादा अधोरेखित केली आहे. युद्ध हे कधीच सर्वांसाठी न्याय्य किंवा क्षम्य ठरत नाही; उलट ते मानवी अस्तित्वालाच आव्हान देणारे ठरते, याचे प्रत्यंतर सध्या जगाला येत आहे.

इराणविरुद्ध अमेरिकेने आणि इस्रायलने उभे केलेले संघर्षाचे वातावरण केवळ दोन-तीन राष्ट्रांपुरते मर्यादित राहिलेले नाही. त्याची झळ संपूर्ण जगाला बसत आहे. अमेरिकेतील लाखो नागरिक स्वतःच्या सरकारविरोधात रस्त्यावर उतरले, ही बाब या युद्धाविरोधातील असंतोषाची तीव्रता दर्शवते. स्वतःच्या देशातच विरोधाचा ज्वालामुखी पेटत असताना, बाह्य युद्ध चालू ठेवण्याचा हट्ट हा नेतृत्वाच्या निर्णयक्षमतेवर प्रश्नचिन्ह उभे करतो.

या संघर्षामुळे आखाती प्रदेशातील अर्थकारण अक्षरशः ढासळले आहे. इंधनसंपन्न देशांमध्येही इंधनटंचाई निर्माण होणे, ही परिस्थिती किती भयावह आहे याचा अंदाज यावरून येतो. तेलाच्या किमती गगनाला भिडल्यामुळे जागतिक महागाईने कळस गाठला आहे. गरीब आणि विकसनशील राष्ट्रे यामध्ये सर्वाधिक भरडली जात आहेत. भारतासारख्या देशालाही या परिस्थितीचा मोठा फटका बसत असून, सामान्य नागरिकांचे जीवन अधिकच कठीण बनले आहे.

युद्धाचा आणखी एक गंभीर परिणाम म्हणजे आंतरराष्ट्रीय व्यापाराची मोडतोड. जागतिक पुरवठा साखळी विस्कळीत झाल्याने अनेक बहुराष्ट्रीय कंपन्यांनी अचानक मोठ्या प्रमाणावर कर्मचाऱ्यांना कामावरून कमी करण्याचे निर्णय घेतले आहेत. हजारो कुटुंबांच्या उपजीविकेवर गदा येणे, ही युद्धाची अप्रत्यक्ष पण अत्यंत भीषण बाजू आहे. वीस वर्षे सेवा केलेल्या कर्मचाऱ्यांनाही क्षणार्धात बाहेरचा रस्ता दाखवला जातो, हे आधुनिक अर्थव्यवस्थेतील अस्थैर्य अधोरेखित करते.

या पार्श्वभूमीवर नाटो सारख्या संघटनांनी युद्धात थेट सहभागी होण्यास नकार दिला, हा एक महत्त्वाचा आणि संयमी निर्णय मानला जातो. मात्र, या निर्णयातून धडा घेण्याऐवजी संबंधित राष्ट्रांवर दबाव टाकण्याची भाषा वापरणे, हे आंतरराष्ट्रीय संबंधांतील तणाव अधिक वाढवणारे आहे. मित्रराष्ट्रांशी असलेले संबंधही आता हितसंबंधांवर आधारित बनले असल्याचे स्पष्ट होते.

दरम्यान, इराणकडून इस्रायलवर झालेले हल्ले आणि त्यातून निर्माण झालेली भीतीदायक परिस्थिती, अण्वस्त्रांच्या वापराची शक्यता अधिकच गडद करत आहे. अण्वस्त्रांचा विचार जरी झाला तरी त्याचे परिणाम मानवजातीसाठी विनाशकारी ठरू शकतात. अशा परिस्थितीत युद्धविरामाच्या घोषणा आणि त्याचवेळी युद्ध भडकवणारी विधाने, यामुळे जागतिक स्तरावर गोंधळ आणि अविश्वास निर्माण झाला आहे.

होर्मुझ सामुद्रधुनीचा प्रश्नही या संघर्षात केंद्रस्थानी आला आहे. ही सामुद्रधुनी जागतिक तेलपुरवठ्याची जीवनवाहिनी मानली जाते. ती बंद राहिल्यास जगभरातील अर्थव्यवस्था आणखी कोलमडण्याची भीती आहे. त्यामुळे या प्रश्नाचे राजनैतिक मार्गाने निराकरण होणे अत्यंत गरजेचे आहे.

युद्धाचा सर्वात दुर्लक्षित पण अत्यंत महत्त्वाचा परिणाम म्हणजे पर्यावरणाची होणारी हानी. स्फोट, धूर, रासायनिक प्रदूषण आणि संसाधनांचा प्रचंड वापर यामुळे पृथ्वीचे संतुलन बिघडत आहे. आधीच हवामान बदलाच्या संकटाशी झुंज देणाऱ्या जगासाठी हे युद्ध आणखी एक गंभीर संकट ठरत आहे.

आजची परिस्थिती पाहता, युद्ध हे कोणत्याही समस्येचे उत्तर नाही, हे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. राजकीय अहंकार, सत्तेची लालसा आणि वर्चस्वाची भावना यामुळे संपूर्ण जगाला संकटात ढकलले जात आहे. अशा वेळी जागतिक नेतृत्वाने संयम, संवाद आणि सहकार्य यांचा मार्ग स्वीकारणे ही काळाची गरज आहे.

मानवतेच्या रक्षणासाठी आणि भविष्यातील पिढ्यांच्या सुरक्षिततेसाठी युद्धविराम आणि शांततेच्या दिशेने ठोस पावले उचलली गेली पाहिजेत. अन्यथा, या युद्धाच्या ज्वाळांमध्ये केवळ राष्ट्रेच नव्हे, तर संपूर्ण मानवजातीचे अस्तित्वच भस्मसात होण्याची भीती नाकारता येत नाही.

# जालना शहर महानगरपालिकेत आयुक्त अंजली शर्मा यांची नियुक्ती

जालना । प्रतिनिधी

जालना महानगरपालिकेच्या रिक्त असलेल्या आयुक्त पदावर अखेर राज्य शासनाने नियुक्ती केली आहे. भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी श्रीमती अंजली शर्मा यांची जालना महानगरपालिकेच्या नवीन आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.



महाराष्ट्र शासनाचे सहसचिव सुभाष उमराणीकर यांनी गुरुवारी (२ एप्रिल) यासंदर्भातील अधिकृत आदेश निर्गमित केले आहेत. अंजली शर्मा या २०२१ च्या बॅचच्या आयएएस अधिकारी असून, यापूर्वी त्या नंदुरबार येथे सहाय्यक जिल्हाधिकारी म्हणून कार्यरत होत्या.

जालना महानगरपालिकेचे आयुक्त पद रिक्त असल्याने जिल्हाधिकारी श्रीमती अशिमा मित्तल यांच्याकडे या पदाचा अतिरिक्त कार्यभार होता. शासनाच्या नवीन आदेशानुसार, नवनियुक्त आयुक्त अंजली शर्मा यांनी जिल्हाधिकारी अशिमा मित्तल यांच्याकडून आपल्या पदाचा कार्यभार तातडीने स्वीकारण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. जालना नगरपालिकेचे रूपांतर महानगरपालिकेत झाल्यानंतर शहराच्या विकासाचे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. नवीन आयुक्तांच्या नियुक्तीमुळे शहरातील रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता आणि इतर नागरी सुविधांच्या कामाला आता गती मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. पदभार स्वीकारल्यानंतर त्यांना 'सुप्रीमो' प्रणालीवर आपला अहवाल अपडेट करण्याच्या सूचनाही सामान्य प्रशासन विभागाने दिल्या आहेत.

# अवकाळी पावसाचा गंगाखेडला तडाखा, कापूस लोंबकळला तर ज्वारी पडली आडवी

गंगाखेड । प्रतिनिधी

गंगाखेड तालुक्यात अवकाळी पावसाने दि.३१ मार्च व दि.१ एप्रिल रोजी रोजी जोरदार हजेरी लावत शेतीपिकांचे मोठे नुकसान केले आहे.परभणी रोडवरील महातपुरी फाटा परिसरात कापसाचे पीक पूर्णपणे उद्ध्वस्त झाले असून खाली लोंबकळले आहे,ज्वारीची पिके आडवी पडून झाडे उन्मळून गेली आहेत.या अचानक आलेल्या पावसामुळे शेतकऱ्यांच्या हाती आलेले पीक क्षणात नष्ट झाल्याने तोंडाला आलेला घास गेल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे.आधीच आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना या नैसर्गिक संकटाचा मोठा फटका बसला आहे.कापसाच्या झाडांवरील बोंडे ओली होऊन खराब झाली आहेत,तर ज्वारीची उभी पिके जमिनीवर कोसळल्याने उत्पादनात मोठी घट होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# सर्वसामान्यावरील अन्यायाला वाचा फोडणारे 'बहाद्दर सैनिक'!

अत्यंत संवेदनशील मनाने.. निसार्थ आणि निर्भीडपणे.. गोरगरीब, अल्पसंख्यांक आणि सर्वसामान्य शेतकरी, शेतमजूर, ऊसतोड कामगार घटकांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध पेटून उठत रस्त्यावर येणारे आणि अशा अन्यायाला वाचा फोडत न्यायासाठी तितक्याच अत्यंत कडवटपणे लोकशाही व्यवस्थेला धरून प्रमाणिकपणे झुंजणारे सैनिक म्हणून या बहाद्दर कार्यकर्त्यांचा आज सन्मानाने गौरव होतोय!



सामाजिक कार्यकर्ते माऊली शिरसाठ, मोहन आघाव सर, केशव तांदळे आणि बांगर सर असे या शूर निस्वार्थी कर्तव्यशील लोकशाहीभिमुख तत्त्वानुसार काम करणाऱ्या बहाद्दर, शूर, वीर, निडर सैनिकांचे नाव आहे.

या समता, बंधुत्व, ऐक्य आणि सर्वधर्म समभावासाठी जाणीवपूर्वक नेतृत्व करत सर्वसामान्यांसाठी आशेचा किरण ठरले आहेत. या कार्यकर्त्यांचा समाजाला पुर्णपणे अभिमान वाटतोय. गेल्या अनेक महिन्यांपासून निर्माण झालेल्या परिस्थितीवर अत्यंत संयमितपणे मार्ग निघावा आणि सर्व मानवी समाज आणि बीड जिल्ह्यातील सर्वांनी एकोप्याने गुण्या- गोविंद्याने नांदावे ही अपेक्षा यांची आहे. यासाठी कर्तव्य निभावताना त्यांना अनेक अडचणी, समस्यांना तोंड द्यावे लागले; किंबहुना संघर्ष करत त्रासही सहन करावा लागला; परंतु तरीही न डगमगता सातत्याने छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर,राष्ट्रपुरुषांच्या आणि राष्ट्रसंत भगवानबाबा यासारख्या महान संत महात्म्यांच्या विचार कार्याला स्मरूण आपला लढा कायम ठेवण्याची भूमिका यांनी कायम ठेवली आहे.

नुकतीच महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय माजी मंत्री आणि विद्यमान धडाडीचे विकासाभिमुख आमदार धनंजयजी मुंडे साहेब यांची त्यांनी भेट घेतली. यावेळी यांच्या कार्याचे कौतुक करत माननीय आमदार धनंजयजी मुंडे साहेब यांनी पाठीवर शाब्बासकीची थाप देत अभिनंदन करत कौतुक केले. बंधुत्व आणि ऐक्याच्या मूल्य निर्मितीसाठी या पुढील काळातील कार्यासाठी त्यांनी या बहाद्दर कार्यकर्त्यांना शुभेच्छा दिल्या. सर्वांनी आमदार धनंजयजी मुंडे साहेब यांचे आभार मानले.

पान ६ वरून...

## पावसाळ्यात अंत्यसंस्कारासाठी

अंत्यसंस्कार करण्याची दुर्दैवी वेळ ग्रामस्थांवर ओढवली.

महासांगवी ग्रामपंचायतीच्या हद्दीत स्मशानभूमीची सोय नसल्याने ग्रामस्थांना उघड्यावर अंत्यसंस्कार करावे लागतात. काल झालेल्या पावसामुळे अंत्यविधी करण्यात मोठी अडचण निर्माण झाली. स्मशानभूमीकडे जाणारा रस्ता अत्यंत खराब आणि चिखलमय असल्याने मृतदेह नेणेही कठीण झाले होते. पाऊस सतत सुरू असल्याने आणि अंत्यसंस्कारासाठी कोणतीही निवारा शेड (शेडनेट) उपलब्ध नसल्याने, ग्रामस्थांना पाऊस उघडण्याची वाट पाहावी लागली. अखेर पाऊस थांबल्यानंतर दुसऱ्या दिवशी अंत्यविधी उरकावा लागला.

ग्रामपंचायत महासांगवीच्या वतीने या गंभीर प्रश्नाकडे वारंवार लक्ष वेधण्यात आले आहे. ''महासांगवी गाव ते स्मशानभूमीकडे जाणारा रस्ता अत्यंत खराब आहे आणि गावात हक्काची स्मशानभूमी नाही,'' असे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. पावसाळ्यात कोणाचे निधन झाल्यास नातेवाईकांना दुःखासोबतच अंत्यसंस्कारासाठीच्या या संघर्षाला सामोरे जावे लागते, ही मोठी शोकांतिका आहे.

तातडीने स्मशानभूमी मंजूर करण्याची मागणी

या घटनेनंतर महासांगवी ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. जिल्हा प्रशासनाने आणि संबंधित विभागाने याकडे गांभीर्याने पाहून जनसुविधा योजनेअंतर्गत तात्काळ स्मशानभूमी आणि पक्का रस्ता मंजूर करावा, अशी मागणी सरपंच आणि समस्त ग्रामस्थांनी केली आहे. आता तरी प्रशासन या प्रलंबित प्रश्नावर ठोस पावले उचलणार का? की ग्रामस्थांना अशाच प्रकारे नरकयातना भोगाव्या लागणार, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

## चमत्कार दाखवण्याच्या बहाण्याने

गोपनीय माहिती मिळाली की, संशयित आरोपी नाशिक जिल्ह्यातील येवला येथील असून ते मदारी खेळ करून हातचालाखी करण्यात सराईत आहेत.

येवल्यातून आरोपीला अटक:

मिळालेल्या माहितीवरून पोलिसांनी येवला गाठले आणि सीसीटीव्हीमध्ये दिसणारा संशयित अशफाक नबाब शेख (रा. सावरगाव, ता. येवला) याला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने आपला साथीदार अशफाक राजू मदारी याच्यासह हा गुन्हा केल्याची कबुली दिली. पोलिसांनी आरोपीकडून २४ हजार रुपये किमतीची सोन्याची अंगठी आणि मोटारसायकल जप्त केली आहे.

पोलीस पथकाची कामगिरी:

सदर कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि महेश विघ्ने, महेश जोगदंड, जफर पठाण, दिलीप गित्ते आणि गणेश मराडे यांच्या पथकाने केली आहे. अटकेतील आरोपीला पुढील कारवाईसाठी केज पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले असून, दुसऱ्या फरार आरोपीचा शोध सुरू आहे

## बीड शहरातील सिग्नल सुरू

बीड शहरातील साठे चौक, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा आणि नगर नाक्यावर नवीन सिग्नल बसवण्याचा निर्णय घेण्यात आला. या ठिकाणी सिग्नल उभे ही केले. मात्र ते कार्यान्वित करण्यात आले नव्हते. पंधरा दिवसापूर्वीच काम पूर्ण झाले होते. मात्र दिनांक १ एप्रिल रोजी झालेल्या अवकाळी पावसामुळे सिग्नल कार्यान्वित होण्यापूर्वीच कोसळले. थातूरमातूर काम करून बिले उचलण्याचा जो उद्योग केला. तो पहिल्याच पावसात उघड झाला. नगरपालिका प्रशासनाने या गुत्तेदाराचे बिल रोखण्याचा निर्णय घेतला असल्याचे सूत्रांकडून सांगण्यात आले. याबरोबरच बीड जिल्ह्याच्या ठिकाणी नवीनच बांधण्यात आलेले बस स्थानकही पहिल्याच पावसात गळू लागल्याने प्रवाशांची अक्षरशा तारांबळ उडाली.या गुत्तेदारावरही कारवाई होणार का? असा सवाल प्रवाशांमधून होत आहे.

## वैराग्याचे मूर्तिमंत रूप शांतीब्रम्ह

आयुष्यभर धन, सत्ता संपत्ती मिळवण्याच्या स्पर्धात आयुष्य खर्च करतो खरं सुख माणसाला मिळतच नाही मनुष्याला खरं सुख मिळण्याच असेल तर संताची कृपा असावी लागते. जीवनच खर सुख संताच्या विचारात आहे. म्हणून मनुष्याने गुरुवर्य शांतीब्रम्ह नवनाथ बाबा महाराज यांच्या चरणाचा दास व्हावे तर खर सुख मनुष्याला अनुभवता येईल असे प्रतिपादन ह भ प गोपाळ महाराज थोटे यांनी कीर्तन सेवेत व्यक्त केले. श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे चैत्र पौर्णिमेच्या निम्मित कीर्तन कार्यक्रमात टाळकरी, माळकरी विणेकरी मृदंग वादक भजनी मंडळी भाविक भक्तांची उपस्थिती होती चैत्र पौर्णिमेची महाप्रसादाचा पंगत जि.प. सदस्य गंगाधर भाऊ घुमरे, रमेश घुमरे, बाळासाहेब घुमरे, अण्णासाहेब लांडे यांची महाप्रसाद पंगत होती.

## हायटेक सिग्नल की हायटेक

आ.विजयसिंह पंडित यांनी तब्बल ६४ लाख रुपये खर्चून आठवडाभरापूर्वी बसविण्यात आलेले हायटेक सिग्नल अवकाळी पावसाने सुरू होण्यापूर्वीच कोसळले असल्याने संबंधित प्रकरणात कारवाईसाठी पुढाकार घ्यावा अशी मागणी डॉ.गणेश ढवळे यांनी केली आहे.

## वडवणीत श्री.हनुमान

भाविकांनी गुलालाची व फुलांची मुक्त उधळण करत व फटाक्यांची प्रचंड आतिषबाजी करत मारोतीरायाच्या जन्माचे स्वागत केले. तसेच अनेक भाविकांनी याप्रसंगी गुळ व मसाला दूध यांचे तर देवस्थान समिती पंच कमिटी यांच्यावतीने मोतीचूर लाडू यांचे सर्व भाविकांना वाटप केले. याप्रसंगी पुरुष भाविकांसोबतच महिला भाविक व तरुण युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यानंतर टाळ मृदंगाच्या गजरात संपूर्ण शहरातून पालखी मिरवणूक काढण्यात आली. व लागलीच महाप्रसादाच्या पंगतींनाही सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी हजारो भाविकांनी उपस्थित राहून महाप्रसादाचा आनंद घेतला. यावेळी संपूर्ण परिसरामध्ये भक्तीमयी वातावरण निर्मिती झाल्याचे पहावयास मिळाले. या जन्मोत्सव सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी संयोजन समितीच्या असंख्य तरुण युवकांनी परिश्रम घेतले.

## पाटोद्याचा गुटखा किंग

४८ लाख ४२ हजार ५०० रुपये).

वाहने: एक आयशर टेम्पो आणि तस्करांच्या सोबतीला असलेली एक स्विफ्ट कार. इतर: आरोपींचे तीन मोबाईल फोन. गुन्हा दाखल झालेले आरोपी:

या तस्करीत बीड जिल्ह्यातील पाटोदा येथील टोळीचा मुख्य सहभाग असल्याचे स्पष्ट झाले आहे. पोलिसांनी खालील आरोपींविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे:

१. संजय सुभाष जगताप (रा. वानेवाडी, ता. पाटोदा, जि. बीड)
२. सचिन परमेश्वर पवार (रा. कुसळंब, ता. पाटोदा, जि. बीड)
३. सतीश तुकाराम सोंडगे (रा. गवळवाडी, ता. पाटोदा, जि. बीड)
४. मिट्टू उर्फ इंद्रजितसिंग ठाकूर (रा. नळदुर्ग, ता. तुळजापूर)

नळदुर्ग पोलिसांच्या या धाडसी कारवाईमुळे गुटखा तस्करांचे मोठे रॅकेट उघड झाले असून, संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे. या प्रकरणाचा अधिक तपास पोलीस करत आहेत.

पान १ वरून...

## ८२९ शाळांची मान्यता

गती दिली असून, वारंवार अपात्र ठरलेल्या शाळांना कायमस्वरूपी अपात्र घोषित करण्याचा निर्णय घेतला आहे. गुरुवारी जारी करण्यात आलेल्या शासन निर्णयानुसार, राज्यातील ३२४ माध्यमिक शाळा, ५०५ उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालये, माध्यमिक स्तरावरील ४१२ तुकड्या आणि उच्च माध्यमिक स्तरावरील ३८२ तुकड्या यांना वेतन अनुदानासाठी कायमस्वरूपी अपात्र घोषित करण्यात आले आहे. या शाळा व तुकड्या आता अनुदानासाठी पात्र राहणार नाहीत.

या निर्णयानुसार, संबंधित शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांना आता स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर मान्यता मिळवण्यासाठी माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालकांकडे अर्ज करावा लागेल. ज्या शाळा कायद्यानुसार अर्ज करतील, त्यांना स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर मान्यता दिली जाईल. मात्र, अर्ज न करणाऱ्या शाळांची मान्यता आपोआप रद्द होईल, असे शासन निर्णयात स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे. राज्य सरकारने गेल्या काही वर्षांपासून विना अनुदानित शाळांच्या गुणवत्ता तपासणीसाठी मूल्यांकन प्रक्रिया अधिक कठोर केली आहे. उद्देश आहे की, अनुदानाचा योग्य वापर व्हावा, शैक्षणिक गुणवत्ता राखली जावी आणि अपात्र शाळांना जबाबदारीत घेतले जावे. आता घेतलेल्या या निर्णयामुळे राज्यातील अनेक खाजगी शाळा प्रशासन आणि पालकवर्गात चर्चेला उधाण आले आहे.

**विद्यार्थ्यांचे समायोजन जवळच्या शाळेत...**

**विद्यार्थ्यांचे समायोजन कसे होणार?**

मान्यता रद्द होणाऱ्या शाळांमधील विद्यार्थ्यांचे समायोजन सोयीप्रमाणे जवळच्या खाजगी अनुदानित शाळा, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या किंवा नागरी स्वराज्य संस्थेच्या माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा किंवा कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये करण्यात येईल. ही समायोजन प्रक्रिया १ मे ते ३१ मे २०२६ या कालावधीत पूर्ण करावी, असे निर्देश देण्यात आले आहेत. सुट्टीच्या कालावधीतही समायोजनाची कार्यवाही सुरू ठेवण्याचे आदेश शासनाने दिले आहेत.

## शक्तिपीठ महामार्गाचा आराखडा

महामार्ग अधिनियम, १९५५ नुसार भूसंपादन करण्याच्या अनुषंगाने प्रसिद्ध केलेली प्रारंभिक अधिसूचना कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ, करवीर, हातकणंगले, कागल, भूदरगड, आजरा तालुक्यांतील मंजूर आखणीसाठी ऑक्टोबर २०२४ रोजीच्या अधिसूचनेन्वये रद्द करण्यात आली आहे. त्यानंतर ऑगस्ट २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये पवनार ते सांगली दरम्यानची आखणी कायम ठेवण्यास मान्यता देऊन, उर्वरित आखणीचे उपलब्ध सर्व पर्याय व संभाव्य पर्याय महाराष्ट्र राज्य रस्ता विकास महामंडळाने तपासून सरकारला सादर करण्याचे निर्देश देण्यात आले होते.राज्य सरकारने जाहीर केलेल्या शासन निर्णयात सातारा जिल्ह्यातून हा मार्ग कोठून जाणार याविषयी मात्र स्पष्टता देण्यात आलेली नाही. मात्र, आता सातारा जिल्ह्यातील शेतक-यांकडूनही या महामार्गाला विरोध होऊ शकतो. याविषयीचा शासन निर्णय बुधवारी सार्वजनिक बांधकाम विभागाने जारी केला.महामार्गाला होत असलेल्या विरोधाच्या पार्श्वभूमीवर, या मार्गात बदल करण्याची मागणी करण्यात येत होती. त्यामुळे, सुधारित प्रस्तावानुसार, हा महामार्ग वर्धा, यवतमाळ, नांदेड, हिंगोली, परभणी, बीड, लातूर, धाराशिव, सोलापूर, सातारा, सांगली, कोल्हापूर, सिंधुदुर्ग या १३ जिल्ह्यांतून, ४० तालुक्यांमधून जात आहे. त्यामुळे २१ धार्मिक स्थळे जोडली जाणार आहेत. महामार्गाची ही सुधारित आखणी अंतिम करण्याचा निर्णय अखेर बुधवारी राज्य सरकारने जाहीर केला.लातूर पर्यटन

## होर्मुझ सामुद्रधुनी सुरळीत

इतर संबंधित देशांच्या संपर्कात आहोत, जेणेकरून आपल्या जहाजांना सुरक्षित मार्ग उपलब्ध होईल.'' भारताच्या या मुत्सद्दी प्रयत्नांना यश मिळत असून, गेल्या काही दिवसांत सहा भारतीय जहाजे होर्मुझ सामुद्रधुनीतून सुरक्षितपणे मार्गस्थ झाली आहेत. सध्या मध्यपूर्वेत सुरू असलेल्या संघर्षामुळे इराणने होर्मुझ सामुद्रधुनीबाबत कठोर भूमिका घेतली असली तरी, भारताच्या मालवाहू जहाजांना मात्र विशेष सवलत देण्यात आली आहे. भारत हा अशा मोजक्या देशांपैकी एक आहे, ज्यांच्या जहाजांना या मोक्याच्या जलमार्गावरून जाण्यास परवानगी मिळाली आहे. यामध्ये भारताच्या घरगुती वापरासाठी अत्यंत आवश्यक असलेल्या एलपीजी () आणि एलएनजी () सारख्या ऊर्जा संसाधनांचा समावेश आहे.दरम्यान, इराणला कोणतीही 'टोल' किंवा शुल्क भरून ही जहाजे मार्गस्थ होत आहेत का, याबाबतच्या चर्चांना परराष्ट्र मंत्रालयाने पूर्णविराम दिला आहे. अशा प्रकारच्या कोणत्याही 'टोल' प्रणालीचे वृत्त मंत्रालयाने फेटाळून लावले आहे.

## खरातविरोधात 'विशेष सरकारी अ

ताब्यात घेतले असून, त्याची चौकशी केली जात आहे. त्यामुळे चौकशीतून काय समोर येते हे पाहणे महत्वाचे असणार आहे. ही केस अजय मिसार यांनी पाहावी अशी विनंती एसआयटीकडून करण्यात आली होती. पण मिसार यांच्याकडे आधीच्याच्या अनेक केसस असल्याने त्यांना या केससाठी वेळ नसल्याने त्यांनी नकार कळवला असल्याची माहिती समोर आली आहे.

त्यामुळे खरातविरोधात केस कोण लढणार असा प्रश्न उपस्थित करण्यात आला असतानाच वकील ॲड. असीम सरोदे यांनी खरात विरोधातील या केसमध्ये 'विशेष सरकारी वकील' म्हणून काम करण्याची इच्छा व्यक्त केली आहे.

त्यांनी एक्स अकाऊंटवरुन ट्वीट शेअर करत याविषयी सांगितले असून, विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती करण्याचे राजकारण आहे. 'यात राजकारण आणू नका' म्हणणाऱ्या मुख्यमंत्र्यांच्या मनात जे राजकारण असेल त्यालाच 'राज्याचे धोरण' म्हणण्याचा प्रघात आहे. अशी टीका त्यांनी केली आहे.

## ४० वस्तू स्वस्त;शॅम्पू,

देशांतर्गत उद्योगासाठी अत्यावश्यक कच्च्या मालाची सहज उपलब्धता सुलभ करणे, हा सरकारच्या या निर्णयाचा उद्देश आहे. या उपक्रमाचा फायदा प्लॅस्टिक, पॅकेजिंग, वस्त्रोद्योग, औषधनिर्माण, रसायने, ऑटोमोटिव्ह पार्ट्स आणि इतर उत्पादन क्षेत्रांना होईल. या सरकारी उपक्रमामुळे सर्वसामान्यांना दैनंदिन गरजेच्या वस्तूंच्या वाढत्या किमतींपासून दिलासा मिळेल.अर्थ मंत्रालयाने जारी केलेल्या एका निवेदनात म्हटले आहे की, पश्चिम आशियातील सुरू असलेल्या संघर्षामुळे जगभरातील जागतिक पुरवठा साखळ्यांवर गंभीर परिणाम झाला आहे. परिणामी, सरकारने अत्यावश्यक पेट्रोकेमिकल कच्च्या मालावरील सीमा शुल्क पूर्णपणे माफ करण्याचा निर्णय घेतला आहे. सरकारने कोणत्या वस्तूंवरील सीमा शुल्क रद्द केले आहे, सरकारने सीमा शुल्कातून सूट दिलेल्या ४० वस्तूंमध्ये मिथेनॉल, टोल्युइन, स्टायरिन, विनाइल क्लोराइड मोनोमर, मोनोइथिलीन ग्लायकोल (एमईजी), फिनॉल, ॲसिटिक ॲसिड, प्युरिफाइड टेरेफ्थॅलिक ॲसिड (पीटीए), पॉलिथिलीन, पॉलिप्रोपिलीन, पॉलिस्टायरिन, पॉलिविनाइल क्लोराइड (पीव्हीसी), पॉलिथिलीन टेरेफ्थॅलेट (पीईटी), तसेच ॲक्रिलोनायट्राइल-ब्युटाडाइन-स्टायरिन (एबीएस) आणि पॉलिकार्बोनेट यांसारख्या अभियांत्रिकी प्लॅस्टिकचा समावेश आहे. ही सर्व उत्पादने ३० जूनपर्यंत सीमा शुल्काशिवाय आयात केली जातील.

मिथेनॉलचा वापर प्लायवूड, इन्सुलेशन फोम, ॲसिटिक ॲसिड, प्लॅस्टिक, सिंथेटिक फायबर, पेंट्स, कोटिंग्ज आणि औषधे बनवण्यासाठी केला जातो. टोल्युइनचा उपयोग रंग, थिनर, गोंद, छपाईची शाई, पेंट रिमूव्हर, रबर, रेझिन आणि प्लॅस्टिक बनवण्यासाठी केला जातो. इन्सुलेशन फोमचा उपयोग टीव्ही/कॉम्प्युटर/मोबाईल फोनची कव्हर, खेळणी आणि ऑटो पार्ट्समध्ये केला जातो. पॉलिस्टीरिनचा उपयोग डिस्पोजेबल प्लेट्स, कप, अंड्यांचे ट्रे आणि आईस्क्रीम कप बनवण्यासाठी केला जातो. व्हायनाइल क्लोराइड मोनोमरचा उपयोग रक्ताच्या पिशव्या, वैद्यकीय नळ्या, खेळणी आणि क्रेडिट कार्ड बनवण्यासाठी केला जातो. मोनोइथिलीन ग्लायकॉलचा उपयोग पाण्याच्या बाटल्या, शीतपेयांच्या बाटल्या, शॅम्पू/तेलाच्या बाटल्या आणि कपडे बनवण्यासाठी केला जातो. पॉलिथिलीनचा उपयोग दूध आणि ज्यूसच्या बाटल्या, पाण्याच्या नळ्या, शॉपिंग बॅग, प्लॅस्टिकच्या पिशव्या, फूड रॅप, सँडविच बॅग, डिस्पोजेबल हातमोजे इत्यादी बनवण्यासाठी केला जातो.

## खुनी सुधारू शकतो

या गुन्हेगारांना हाताळण्याचा हाच सर्वोत्तम पर्याय आहे.श्रीवास्तववर आयपीसीच्या कलम ४२०/१२०बी आणि आयटी ॲक्टच्या कलम ६६डी अंतर्गत गुन्हे दाखल आहेत. तो १२ मे २०२५ पासून तुरुंगात असून, त्याच्यावर यापूर्वीही तीन गुन्हे नोंद आहेत. त्याने एका व्यक्तीला 'पार्ट-टाइम जॉब'चे आमिष दाखवून ६,५५,७०० रुपयांची फसवणूक केल्याचा आरोप आहे. यासाठी त्याने पाच बँक खाती उघडली होती आणि काही युपीआय () व्यवहारांशी तो संबंधित असल्याचेही तपासात समोर आले आहे. उच्च न्यायालयाने जामीन नाकारताना म्हटले होते की, डिजिटल तंत्रज्ञानाच्या प्रगतीसोबतच सायबर गुन्ह्यांचे प्रमाण वाढत आहे. हे गुन्हे एका 'सायलेंट व्हायरस'सारखे असून, ते केवळ पैशांचेच नाही, तर समाजाचे मोठे नुकसान करत आहेत. दरम्यान, मागील वर्षी सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने 'डिजिटल अरेस्ट' प्रकरणांची स्वतःहून (सुओ मोटो) दखल घेतली होती. हरियाणामधील अंबाला येथील एका ७३ वर्षीय महिलेची १ कोटी रुपयांहून अधिक रकमेची फसवणूक करण्यात आली होती. स्कॅमर्सनी सर्वोच्च न्यायालयाच्या बनावट आदेशांचा वापर करून तिला 'डिजिटल अरेस्ट' केले होते. या घटनेनंतर गृह मंत्रालयाने 'डिजिटल अरेस्ट'च्या सर्व पैलूंची तपासणी करण्यासाठी एका उच्चस्तरीय आंतर-विभागीय समितीची स्थापना केली आहे.

## चॅट जीपीटी तुमच्या

मुलांची विचार करण्याची क्षमता विकसित होणे आवश्यक असते, मात्र अशा वेळी चॅट जीपीटीच्या वापरामुळे ही क्षमता कमी होते. कार्नेगी मेलॉन युनिव्हर्सिटी आणि मायक्रोसॉफ्टला असे आढळून आले आहे की, जर एखादी व्यक्ती एआयचा गरजेपेक्षा जास्त वापर करत असेल किंवा प्रत्येक छोट्या गोष्टीसाठी एआयवर अवलंबून असेल तर त्या व्यक्तीची समस्या सोडवण्याची क्षमता कमकुवत होऊ शकते.

**१० पैकी ६ विद्यार्थी ग्रस्त**

ब्रिटनमधील शालेय मुलांवर एक अभ्यास करण्यात आला, जो ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसमध्ये प्रकाशित झाला. या रिसर्चमध्ये असे आढळले की, दर १० पैकी ६ विद्यार्थ्यांना असे वाटले की एआय टूल्सनी त्यांच्या कामाशी संबंधित क्षमतेवर परिणाम केला आहे. मात्र, एआयच्या मदतीने मुलांचे काम सोपे झाले आहे, हेही तितकेच खरे आहे.

cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शुक्रवार दि.३ एप्रिल २०२६




## ब्युटीफूल लाईफ फाउंडेशनच्या वतीने बाल हृदयरोग शिबिर

बीड । प्रतिनिधी

अ ब्युटीफूल लाईफ फाउंडेशन,मुंबई, युनिव्हर्सल वेल्फेअर व सोशल रिफॉर्म फाउंडेशन बीड यांच्या संयुक्त विद्यमाने बीड येथे मोफत बाल हृदयरोग शिबिर यशस्वीरित्या पार पडले. फाउंडेशनच्या डॉ. पारुल शहा यांच्या प्रयत्नातून बाई जेरबाई चिल्ड्रन हॉस्पिटल मुंबई येथील डॉ. श्रीपाल जैन यांनी रुग्णांची तपासणी केली. यावेळी डॉ.पारुल शहा म्हणाल्या की आतापर्यंत अनेक मोफत तपासणी शिबिर संपन्न केले व बाई जेरबाई वाडिया हॉस्पिटल येथे रुग्णावरती मोफत उपचार केलेले आहेत यामध्ये त्यांना डॉ.श्रीपाल जैन यांचे मोलाचे सहकार्य लाभले. या कार्यक्रमासाठी डॉ. अनंत मुळे सर अध्यक्ष आय एम ए बीड डॉ.अमोल गीते डॉ.सचिन सानप डॉ. सुनील गायकवाड उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. बाबासाहेब शेंडगे यांनी केले व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सलीम पठाण यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## साईबाबा मंदिरात भगव्या ध्वजाची स्थापना

आष्टी (प्रतिनिधी)



आष्टी शहरातील धनवडे वस्ती रोडवरील सुरू असलेल्या साईबाबा मंदिर बांधकाम आणि सभागृह याच्या समोर साई भक्तांच्या वतीने भगव्या ध्वजाची विधिवत स्थापना करण्यात आली आहे. या ध्वजस्थापनेमुळे परिसरात धार्मिक व भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे. साई भक्त मंडळ, आष्टी यांच्या पुढाकाराने ही ध्वज स्थापना करण्यात आली असून, यावेळी स्थानिक साई भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. भगवा ध्वज हा श्रद्धा, संस्कृती व एकतेचे प्रतीक मानला जात असून, या स्थापनेमुळे मंदिर परिसराची शोभा अधिकच वाढली आहे. यावेळी उपस्थित साई भक्तांनी हा उपक्रम भविष्यातील धार्मिक व सामाजिक कार्यांसाठी प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास व्यक्त केला.

## प्रा. अशोक काळे लिखीत इंग्रजीचे पुस्तक विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी -डॉ.आनंदगांवकर

माजलगाव । प्रतिनिधी



सध्याच्या स्पर्धेच्या युगात प्रा.अशोक काळे यांनी लिहीलेल्या इंग्रजीचे पुस्तक हे विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार असल्याचे प्रतिष्ठीत डॉ प्रकाश आनंदगांवकर यांनी सांगीतले. येथील अशोक काळे यांनी लिहिलेल्या द कंम्पलिट स्पोकन इंग्लिश कोर्स या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यात ते बोलत होते. कार्यक्रमास जगदीश साखरे, डॉ.कमलकिशोर लड्डा,बी.एन. कुलकर्णी, समीक्षक डॉ. युवराज मुळये, पत्रकार संघाचे अध्यक्ष उमेश मोगरेकर,पत्रकार कलेश जाब्रस,दत्ता काळे,बाबू जोशी, शिवसेना तालुका प्रमुख तुकाराम येवले,प्रशांत पत्की,प्रवीण शेजूळ तसेच इतर मान्यवरांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीकृष्ण शिंदे यांनी केले तर आभार पुस्तकाचे लेखक अशोक काळे यांनी मानले.

## मोहा गावात बसवला १० एमव्हीएचा ट्रान्सफॉर्मर

परळी वैद्यनाथ

माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांच्या प्रयत्नातून महावितरण मार्फत परळी वैद्यनाथ तालुक्यातील मोहा येथे १० एमव्हीएचा ट्रान्सफॉर्मर बसविण्यात आला आहे. परिसरातील विजेच्या तुटवड्यावर यामुळे मात होणार आहे. धनंजय मुंडे यांना जनता संवाद उपक्रमांतर्गत मोहा सह परिसरातील गावातील पदाधिकारी व नागरिकांनी याबाबत विनंती केली होती. त्यानुसार महावितरणच्या शाखा अभियंता व कार्यकारी अभियंता यांना सूचना देत धनंजय मुंडे यांनी हा ट्रान्सफॉर्मर उपलब्ध करून दिला आहे.



यामुळे मोहा सह परिसरातील कान्नापूर, मुंगी, देवठाणा, जैतापूर, त्याचबरोबर बोधेगाव, म्हातारगाव, कावळ्याची वाडी, इत्यादी गावांना लाभ होणार असून, कान्नापूर व बोधेगाव येथील ११ केव्ही वरील अतिरिक्त भार कमी होण्यास मदत मिळून अधिकचा फायदा शेतकरी व नागरिकांना होणार आहे.

# द्वारकादास मंत्री बँकेस २ कोटी १ लाख रुपयाचा निव्वळ नफा -डॉ.आदित्य सारडा

## आर्थिक स्थिती अत्यंत बळकट : ६५ कोटी ७१ लाखांच्या ठेवी, ५८ कोटी १८ लाखांचे बँकेने वाटले कर्ज

बीड । प्रतिनिधी

बीड येथील द्वारकादास मंत्री नागरी सहकारी बँक लि.,बीड चे सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाचे हिशोब पूर्ण झाले असून आर्थिक वर्षात बँकेस २०१ लाखांचा नफा झाला. बँकेची आर्थिक स्थिती अत्यंत बळकट असून ६५ कोटी ७२ लाखांच्या ठेवी तर ५८ कोटी २४ लाखांचे बँकेने कर्ज वाटप केले आहे. नवीन आर्थिक वर्षात बँक गरजूंना विविध कर्ज योजनांद्वारे तात्काळ कर्ज उपलब्ध करून देणार असल्याची माहिती बँकेचे अध्यक्ष डॉ. आदित्य सुभाषचंद्र सारडा यांनी दिली.

डॉ. आदित्य सारडा म्हणाले की, बँकेचे नेट वर्थ २१ कोटी ७५ लाख झाले आहे. बँकेच्या सभासदांनी भागभांडवलापोटी बँकेत १७ कोटी ८२ लाख गुंतवले आहेत. बँकेने सर्व प्रकारच्या तरतुदी व निधी रिझर्व्ह बँकेच्या नियमाप्रमाणे उभारले आहेत. वर्षाअखेर बँकेकडे एकूण निधी व तरतुदी ९३ कोटी २२ लाख एवढ्या उपलब्ध आहेत. यामध्ये राखीव निधी १५ कोटी २८ लाख, बुडीत व संशयित निधी ५१ कोटी ४५ लाख, इमारत निधी २ कोटी ७२ लाख, इतर निधी व





तरतुदींचा समावेश आहे. वर्षाअखेर बँकेकडे रोख व इतर बँकांतील शिल्लक १७ कोटी १९ लाख असून ८० कोटी रुपयांची गुंतवणूक शासकीय व इतर बँकांत केलेली आहे. बँकेची एकूण लिक्विडिटी ९५ कोटींच्या वर आहे. यावरून बँकेची एकूण आर्थिक स्थिती किती भक्कम आहे हे सिद्ध होते.

बँकेकडे कर्ज वाटपासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध आहे. आजपासून सुरू होत असलेल्या नवीन आर्थिक वर्षात गरजूंना विविध प्रकारच्या कर्ज योजनांद्वारे तात्काळ कर्ज उपलब्ध करून देणार असल्याची माहिती - अध्यक्ष डॉ. आदित्य सुभाषचंद्रजी सारडा यांनी दिली. यावेळी बँकेचे उपाध्यक्ष शुभम चितलांगे, संचालक सी.ए. गिरीश गिल्डा, डॉ. आदिती सारडा, संतोष लहाने, अंजली पाटील, रघुनाथ चौधरी, डॉ. राहुल खडके, दिनेश देशपांडे, शेख मोहम्मद सलीम, प्रल्हाद वाघ, सुधाकर वैष्णव, राम गायकवाड, सतीश धारकर, बँकेचे प्र. मुख्यकार्यकारी अधिकारी शफियोद्दिन मोमीन, राधेश्याम सोनी यांच्यासह बँकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.बँकेचा सीआरएआर चे प्रमाण १०२.८२ टक्के, निव्वळ एन.पी.ए. चे प्रमाण ०.०० टक्के : वर्षाअखेर बँकेचा सीआरएआर चे प्रमाण १०२.८२ टक्के इतके झाले आहे. हे रिझर्व्ह बँकेच्या नियमाप्रमाणे ते सक्षम बँकेस तो ९ टक्के इतकाच लागतो. तो मंत्री बँकेचा१० पटीने जास्त आहे आणि निव्वळ एन.पी.ए. ०.०० टक्के आहे.

युद्ध काळातही बँक बळकट जिथे जागतिक बाजार मोठ्या प्रमाणात कोसळला आहे : वर्षाअखेर बँकेने शासकीय रोख्यांमध्ये ८० कोटीच्या वर गुंतवणूक केलेली असून जागतिक युद्धकाळात बाजारातील चढ-उतारामुळे कमी झालेल्या किमतींमुळे होणाऱ्या नुकसानीसाठीही बँकेने आवश्यक ती तरतूद घेतली आहे.

## आष्टी तालुक्यात हनुमंतरायाचा जन्मोत्सव उत्साहात साजरा

### गावोगावी भक्तिभाव, महाप्रसाद व धार्मिक उत्सवांची रेलचेल



आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यात हनुमंतरायाचा जन्मोत्सव मोठ्या भक्तिभावाने व उत्साहात साजरा करण्यात आला. गावोगावी मंदिरांमध्ये पहाटेपासूनच पूजाअर्चा, अभिषेक आणि महाप्रसादाच्या कार्यक्रमांनी वातावरण भक्तिमय झाले होते.आष्टी शहरातील पोलीस स्टेशन शेजारील हनुमान मंदिर, दक्षिणमुखी मारुती मंदिर तसेच व्यापार पेठेतील हनुमान मंदिर येथे सकाळी नेमक्या सहा वाजून २२ मिनिटांनी जन्मोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून पूजा-अर्चा केली व महाप्रसादाचा लाभ घेतला. मंदिर परिसर आकर्षक रोषणाईने सजविण्यात आला होता.

क-हेवाडी येथेही सालाबादप्रमाणे पारंपारिक पद्धतीने हनुमान जन्मोत्सव साजरा करण्यात आला. गावचे सरपंच तथा सामाजिक कार्यकर्ते परिवंत गायकवाड यांच्या हस्ते हनुमंतरायाचा महाअभिषेक व पूजाविधी पार पडले. त्यानंतर ग्रामस्थांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. याशिवाय, आष्टी शहरातील शेकापूर रस्त्यालगत असलेल्या मानाच्या दक्षिणमुखी हनुमान मंदिरातही विविध धार्मिक विधी, पूजाअर्चा आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. हनुमंतराय ही सर्वसामान्यांची आराध्य दैवत मानली जाते. त्यामुळे प्रत्येक गावात हनुमान मंदिर असून, या जन्मोत्सवानिमित्त सर्वत्र आनंदाचे व भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते. अशा प्रकारे आष्टी तालुक्यात हनुमंतरायाचा जन्मोत्सव हर्षोल्हासात आणि मोठ्या थाटामाटात संपन्न झाला.

## नवनिर्वाचित पोलीस युवकांचा पै. सतीश शिंदेकडून सत्कार

आष्टी । प्रतिनिधी

ग्रामीण भागातील युवकांनी स्पर्धेच्या युगात स्वतःचे स्थान निर्माण करत पोलीस दलात निवड मिळवणे ही केवळ वैयक्तिक यशाची बाब नसून, सामाजिक आणि राजकीय दृष्टिकोनातूनही महत्त्वाची घडामोड मानली जात आहे. अशा यशस्वी युवकांच्या सत्कारातून समाजात सकारात्मक संदेश देण्याबरोबरच स्थानिक नेतृत्वाची युवकांशी असलेली नाळ अधिक दृढ होत असल्याचे चित्र आष्टीत पाहायला मिळाले. आष्टी शहरातील जय हनुमान तालीम येथे राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष पैलवान सतीश आबा शिंदे यांच्या पुढाकारातून नवनिर्वाचित पोलीस युवकांचा सत्कार सोहळा उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात नऊ युवकांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला.



या प्रसंगी बोलताना सतीश शिंदे यांनी युवकांच्या यशाचे कौतुक करताना स्पष्ट केले की, ‘‘युवक हेच देशाचे भवितव्य आहेत. त्यांनी मिळवलेले यश केवळ त्यांच्या कुटुंबापुरते मर्यादित नसून, संपूर्ण समाजासाठी प्रेरणादायी ठरते. अशा वेळी त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देणे ही सामाजिक जबाबदारी आहे. राजकीय विश्लेषकांच्या मते, अशा प्रकारचे सत्कार सोहळे हे केवळ अभिनंदनापुरते मर्यादित राहत नाहीत, तर स्थानिक राजकारणात युवकांशी संवाद वाढवण्याचे प्रभावी माध्यम ठरतात. आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्था व निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर युवकांचा वाढता सहभाग आणि त्यांच्याशी जोडलेले नेतृत्व याला विशेष महत्त्व प्राप्त होत आहे. याशिवाय, पोलीस दलात निवड झालेल्या युवकांच्या माध्यमातून कायदा-सुव्यवस्थेची जाणीव आणि सामाजिक बांधिलकी मजबूत होण्यासही हातभार लागतो. त्यामुळे अशा उपक्रमांना सामाजिक भानासोबतच राजकीय दृष्टीनेही महत्त्व प्राप्त होत असल्याचे जाणकारांचे मत आहे. कार्यक्रमाच्या शेवटी सतीश शिंदे यांनी सर्व नवनिर्वाचित युवकांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देत, प्रामाणिकपणे कर्तव्य बजावून समाजात आदर्श निर्माण करण्याचे आवाहन केले. या सत्कार सोहळ्यामुळे आष्टी तालुक्यात युवकांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून, सामाजिक कार्य आणि राजकीय सहभाग यांचा संगम अधिक दृढ होत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

# शिक्षिकेला निरोप देताना विद्यार्थिनींच्या अश्रूंचा बांध फुटला..!

## मुख्याध्यापिका विजया कोरडे यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा

माजलगाव । प्रतिनिधी

अनेक वर्ष सहवासातील आपल्या लाडक्या शिक्षिकेला निरोप देताना शाळेतील विद्यार्थिनींच्या अश्रूंचा बांध फुटला.ज्यांनी आयुष्यभर पुरणारी संस्काराची शिदोरी दिली त्या विजया कोरडे यांना निरोप देताना विद्यार्थ्यांना अक्षरशः रडू कोसळले. ‘‘ मॅडम, तुम्ही जाऊ नका.’’ अशी विनंती मुली करत होत्या. शाळा सोडतांना कोरडे यांनाही गहिवरून आले. सावरगाव केंद्रातील प्रा शा. गुजर पंचशील नगर, किट्टी आडगाव येथील मुख्याध्यापिका विजया कोरडे या नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्या, त्यांना केंद्रातील सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांच्या वतीने भावपूर्ण निरोप देण्यात आला.

माजलगाव शहरातील हॉटेल सुखसागर येथे संपन्न झालेल्या सेवापूर्ती गौरव सोहळा कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केंद्रप्रमुख समाधान शिंदे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून गट शिक्षण



अधिकारी हकीम, देवदूत प्रतिष्ठानचे अध्यक्ष बंडू खांडेकर, नगरसेवक चाऊस बिलाल, शिक्षक नेते रमेश फपाळ, वर्षा भावले - कोरडे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी नितीन काळे, किशनराव हराळ, बाबासाहेब आगे, अशोक वाडेकर, ज्ञानेश्वर भोरगिर, वीरभद्र स्वामी, भगवान गडदे, काळे सर तसेच कीट्टी आडगाव व सावरगाव केंद्रातील मुख्याध्यापक, शिक्षक,नातेवाईक व स्नेहिजन उपस्थित होते.

आजकाल जिल्हा परिषदेच्या शाळांसमोर मोठी आव्हाने उभा राहिली आहेत. येणाऱ्या काळात त्या वाचतील की नाही? अशी शंका येत आहे. त्या वाचवण्याची जबाबदारी प्रत्येक शिक्षकांची आहे. तेंव्हा शिक्षकांनी शिक्षकी पेशा ही नोकरी किंवा व्यवसाय नसून तो पवित्र वसा असल्याचे भान पावलोपावली ठेवावे. तन मन व धनाने विद्यार्थी घडवण्यासाठी स्वतः ला झोकून द्यावे.
- विजया चंदनराव कोरडे (निवृत्त मुख्याधपिका)

वेळेचे महत्व, दर्जेदार अध्यापन व शिस्तप्रिय असल्यामुळे विजया कोरडे मॅडम यांच्याबद्दल सर्वच विद्यार्थ्यांमध्ये आपलेपणाची भावना निर्माण झाली होती. या शाळेत विविध उपक्रम त्यांनी राबविले. विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढली पाहिजे, यासाठी त्यांची नेहमीच तळमळ होती. त्यामुळे त्याचं व विद्यार्थी यांचं नातं केवळ वर्गापुरतं मर्यादित राहिलं नाही, ते मनापर्यंत पोहोचलेलं होतं. त्यामुळे त्यांच्या निरोपाचा भावूक प्रसंग अनुभवतांना अनेकांच्या मनाचा ठाव घेतला. गुरू म्हणजे केवळ शिकवणारा नसतो, तर आयुष्य घडवणारा असतो असे प्रतिपादन गटशिक्षण अधिकारी हकीम यांनी केले . कोरडे यांच्या निरोप समारंभाला असलेली गर्दी सर्व काही सांगून जाते असेही ते म्हणाले. विजया कोरडे या शाळेत जरी शिक्षिका असल्या तरी नातेवाईकांमध्ये त्या सर्वांच्या मार्गदर्शक आहेत. सर्वांच्या अडीअडचणीमध्ये कायम पाठीशी ठामपणे उभा राहण्याची त्यांची भूमिका असल्याचे मत बंडू खांडेकर यांनी मांडले. उपस्थित सर्वांनी त्यांना उत्तम व दीर्घायुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रमोद काळे यांनी केले. बहारदार सूत्रसंचालन फुलचंद इंगोले यांनी तर आभार जोशी यांनी मानले.

# तूर, उडीदच्या मुक्त आयातीला मुदतवाढ!

## देशातील बाजारावर दबाव राहण्याची शक्यता

पुणे : केंद्र सरकारने तूर आणि उडदाच्या मुक्त आयातीला एक वर्षाची मुदतवाढ दिली आहे. तसेच पिवळ्या वाटाण्याच्या आयातीवरील ३० टक्के शुल्क कायम ठेवले आहे. देशातील उत्पादन घटल्यामुळे आणि येणाऱ्या खरिपावर 'एल-निनो'चे सावट असल्याने तूर, उडीद आणि पिवळ्या वाटाण्याची आयात सुरळीत राहण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. याचा दबाव देशातील बाजारावर राहण्याची शक्यता आहे.

केंद्र सरकारच्या विदेश व्यापार महासंचालनालयाने वेगवेगळ्या अधिसूचना काढून कडधान्य धोरण कायम ठेवले आहे. तूर आणि उडीद मुक्त आयातीची मुदत ३१ मार्च २०२६ रोजी संपत होती. त्यानंतर तूर आणि उडीद आयातीवर शुल्क लागू होणार होते. तसेच पिवळा वाटाणा आयात प्रतिबंधित श्रेणीतून काढत मुक्त श्रेणीत ठेवली, तसेच किमान आयात मूल्यही काढले होते. पण १ नोव्हेंबर २०२५ पासून पिवळा वाटाणा आयातीवर ३० टक्के शुल्क लागू केले होते. देशात मागील तीन वर्षांपासून कडधान्य आयात वाढत आहे. २०२४-२५ मध्ये देशात जवळपास



७३ लाख टन कडधान्य आयात झाली होती. यंदाही ५३ लाख टन आयातीचा अंदाज आहे. तूर, उडीद आणि पिवळ्या वाटाण्याची विक्रमी आयात होऊन देशात भाव पडले आहेत. त्यामुळे आयात शुल्क वाढविण्याची मागणी केली जात होती. पण केंद्र सरकारने आहे तेच धोरण पुढील वर्षभर कायम ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

तूर आणि उडदाची आयात ३१ मार्च २०२७ पर्यंत मुक्त राहणार आहे. म्हणजेच आयातीवर शुल्क आणि मर्यादा नसेल. तर पिवळा वाटाणा आयातीवर केवळ ३० टक्के शुल्क कायम राहील. आयातीच्या लोंढ्यामुळे मागील दोन वर्षांत शेतकऱ्यांना कडधान्यासाठी चांगला भाव मिळाला नाही. त्यामुळे खरिपात शेतकऱ्यांनी कडधान्याची लागवड कमी केली होती. परिणामी, यंदा तुरीचे उत्पादन केवळ ३४ लाख टन होण्याची शक्यता आहे.देशात ४७ लाख टन तुरीचा वापर होतो. सरकार तुरीच्या उत्पादनातील तूट आयात करून भरून काढणार आहे. त्यासाठी आयात मुक्त ठेवली आहे. याचा फटका शेतकऱ्यांना बसू शकतो. २०२४-२५ मध्ये देशात १२ लाख ३२ हजार टन आयात झाली होती. तर २०२५-२६ मध्ये विक्रमी १४ लाख ५० हजार टन आयात झाल्याची माहिती आहे. आता नव्या वर्षातही सरकारच्या निर्णयामुळे आयात अधिक राहण्याचा धोका आहे. दरम्यान, सरकारने मुक्त तूर आयातीचे धोरण कायम ठेवण्याचा निर्णय घेतला तरी त्याचा बाजारावर परिणाम दिसून आला नाही. कारण देशातील उत्पादन पाहता सरकार तूर आणि उडीद आयात मुक्त ठेवेल याचा अंदाज बाजारात आधीपासून व्यक्त केला जात होता. त्यामुळे बाजारावर या निर्णयाचा परिणाम जाणवला नाही.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१९४८ : ओरिसा उच्च न्यायालयाची स्थापना
१९७३ : मार्टिन कूपर या मोटोरोला कंपनीतील संशोधकाने जगातील पहिला मोबाईल टेलिफोन कॉल बेल लॅब्जमधील डॉ. जोएल अँगेल याला केला.
१९७५ : बॉबी फिशरने अनातोली कार्पोव्ह विरुद्ध खेळण्यास नकार दिल्यामुळे अनातोली कार्पोव हा बुद्धिबळात जगज्जेता बनला.
१९८४ : भारताचा पहिला अवकाशयात्री राकेश वर्मा याची दोन रशियन अंतराळवीरांसह अंतराळप्रवासाला सुरुवात
२००० : आय. एन. एस. आदित्य हे नौकांना इंधन पुरवणारे संपूर्ण भारतीय बनावटीचे वेगवान जहाज नौदलाच्या ताफ्यात दाखल झाले.
२०१० : ऍपल कंपनी ने आयपॅड या टॅब्लेट संगणकाची पहिली आवृत्ती जाहीर केली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७८१ : स्वामीनारायण, भारतीय धर्मगुरू.
१८८२ : प्रसिध्द कादंबरीकार नाथमाधव.
१८८२ : द्वारकानाथ माधव पितळे उर्फ 'नाथमाधव' सामाजिक व ऐतिहासिक कादंबरीकार. त्यांच्या 'वीरधवल', 'रायक्लब' अथवा सोनेरी टोळी' या कादंबर्यांनी वाचकांना अक्षरश: वेड लावले होते. (मृत्यू: २१ जून १९२८)
१९०३ : कमलादेवी चट्टोपाध्याय मॅगसेसे पुरस्कार विजेत्या (१९६६) स्वातंत्र्यसैनिक व सामाजिक कार्यकर्त्या (मृत्यू: २९ आक्टोबर १९८८)
१९०४ : रामनाथ गोएंका 'इन्डियन एक्सप्रेस' वृत्तपत्रसमुहाचे संस्थापक, स्वातंत्र्य चळवळीतील नेते (मृत्यू: ५ आक्टोबर १९९१)
१९१४ : भारताचे पहिले फील्डमार्शल जनरल माणकेशा.
१९३० : जर्मन चॅन्सेलर हेल्मुट कोल्ह
१९१४ : फील्ड मार्शल सॅम माणेकशा (मृत्यू: २७ जून २००८)
१९३४ : जेन गुडॉल इंग्लिश प्राणिशास्त्रज्ञ
१९६२ : जयाप्रदा चित्रपट अभिनेत्री व संसद सदस्य
१९६५ : नाझिया हसन पाकिस्तानी पॉप गायिका (मृत्यू: १३ ऑगस्ट २०००)
१९७३ : भारतीय क्रिकेट खेळाडू निलेश कुलकर्णी यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६८० : छत्रपती शिवाजी राजे भोसले (जन्म: १९ फेब्रुवारी १६३०)
१८९१ : एडवर्ड लूकास फ्रेन्च गणिती (जन्म: ४ एप्रिल १८४२)
१९८१ : पॅन अमेरिकन वर्ल्ड एरलाईन्स चे स्थापक जुआन त्रिप्प यांचे निधन.(जन्म: २७ जून १८९९)
१९८५ : डॉ. वासुदेव विष्णू मिराशी महामहोपाध्याय, संस्कृत विद्वान, प्राच्यविद्यासंशोधक (जन्म: १३ मार्च १८९३)
१९९८ : हरकिसन मेहता प्रसिद्ध गुजराती कादंबरीकार, 'चित्रलेखा प्रकाशन'चे मुख्य संपादक (जन्म:)
१९९८ : मेरी कार्टराइट इंग्लिश गणितज्ञ (जन्म: १७ डिसेंबर १९००)
२०१२ : भारतीय राजकारणी गोविंद नारायण यांचे निधन. (जन्म: ५ मे १९१६)

# जिवाणू खतांचा योग्य वापर आणि फायदे



पिकासाठी नत्र पालाश आणि पालाश यांच्या उपलब्धतेसाठी जैविक खते उपयुक्त ठरतात. या खतांचा योग्य वापर केल्यास जमिनीची सुपीकता वाढून पिकाच्या उत्पादनामध्ये दहा ते पंचवीस टक्क्यांपर्यंत होते. काही जिवाणू हवेतील नायट्रोजन नत्र शोषून व साठवून नंतर पिकांना उपलब्ध करून देण्याचे कार्य करतात. या जिवाणूंची प्रयोग शाळेत वाढ करून, त्यापासून खते तयार केली जातात. अलीकडे जमिनीतून स्फुरद, पालाश, झिंक आणि लोह इत्यादी अन्नद्रव्यांची उपलब्धता करणारी जिवाणू खतेही उपलब्ध झाली आहेत. शेंगवर्गीय पिके आणि भुईमूग बियाणास रायझोबियम + पी एस बी ही जिवाणू खते प्रत्येकी २५० ग्रॅम प्रति दहा किलो या प्रमाणात पेरणी आधी बीज प्रक्रिया करावी. गहू, ज्वारी, मका या पिकाच्या पेरणीच्या वेळी अझोटोबॅक्टर + पी एस बी प्रत्येकी २५० ग्रॅम प्रति दहा किलो या प्रमाणात बीज प्रक्रिया करावी.

जिवाणू खते का वापरावीत ?

जैविक खतामुळे जमिनीची सुपीकता आणि पोत सुधारतो, जमीन जैविक क्रियाशील बनते व उत्पादन क्षमतेमध्ये वाढ होते. आर्थिक आणि पर्यावरणाचे समतोल राखण्यास मदत होते. शेंगवर्गीय पिकामध्ये जिवाणू खताचा वापर केल्यास नत्रयुक्त गाठींचे प्रमाण मुळावर वाढते. हे जिवाणू हवा व जमिनीतील नत्र झाडाला उपलब्ध करतात. जिवाणूमुळे जमिनीत स्थिर झालेले स्फुरद विविध रूपातून मुक्त करून मुलांना उपलब्ध केले जातात. जिवाणू मातीतील सेंद्रिय पदार्थ मोठ्या प्रमाणात कुजवतात या प्रक्रियेत विविध सेंद्रिय आम्ल तयार होतात, त्यामुळे विविध अन्नद्रव्यांची उपलब्धता वाढते. जिवाणू खतांचे प्रमाण अत्यंत तुम्ही असून, कमी खर्चात उपलब्ध होतात. मात्र उत्पादनात दहा ते २५ टक्क्यापर्यंत वाढ होते. जमिनीच्या भौतिक व रासायनिक गुणधर्मात उपयुक्त बदल होतात. पिकासाठी वापरलेल्या रासायनिक खतांची कार्यक्षमता वाढण्यास मदत होते. शेतातील मातीची सुपीकता टिकण्यास मदत होते.

रायझोबियम : या जिवाणूंचे कार्य सहजीवी पद्धतीने चालते, हे जिवाणू कडधान्य वर्गीय पिकाच्या मुळावर ग्रंथी निर्माण करतात. या ग्रंथी मध्ये राहून हवेतील नत्र वायु शोषून घेऊन पिकास उपलब्ध करून देतात. या जिवाणूंचा नत्र रोपांची आवश्यकता असते.

अझोटोबॅक्टर: हे जिवाणू जमिनीत स्वतंत्रपणे वनस्पतीच्या मुळाभोवती राहून असहजीवी पद्धतीने नायट्रोजनएज या विकराच्या सहाय्याने हवेतील नत्र स्थिरीकरणाचे कार्य करतात. या जिवाणूंच्या अनेक जाती आहेत परंतु भारतासारख्या उष्ण प्रदेशाच्या जमिनीत मात्र अजून उपजात प्रामुख्याने दिसून येते. अझोटोबॅक्टर जिवाणू हवेतील मुक्त स्वरूपात असणाऱ्या नत्र वायूचे स्थिरीकरण करून, पिकास उपलब्ध करून देतात.

स्फुरद विरघळविणारे जिवाणू : स्फुरद जिवाणूंचा वापर करून मातीच्या कणावर स्थिर होणारे स्फुरदचे प्रमाण कमी करून त्याची उपलब्धता वाढविता येते. कडधान्य व तेलवर्गीय पिकामध्ये नत्रापेक्षा स्फुरदाची गरज अधिक असते. जमिनीत पुरेसे स्फुरद उपलब्ध असेल तर पिकामध्ये कार्ब युक्त पदार्थ प्रामुख्याने कर्बोदके तयार होण्याच्या प्रक्रियेला वेग येतो. पिकाच्या मुळाची जोरदार वाढ होते. पिक लवकर फुलोऱ्यात येतात व धान्याचे उत्पादन अधिक स्वरूपात येतात.

जिवाणू खते वापरताना : बियाणास आंतरशीकरण, रोपाच्या मुळावर आंतरशीकरण, मातीत मिसळणे, ठिबक सिंचनाद्वारे, पिकाच्या मुळाभोवती देणे. जिवाणू खते सूर्यप्रकाश व उष्णतेपासून, थंड व कोरड्या जागी साठवावीत. रायझोबियम खते पीक निहाय वापरावीत. जिवाणू खते रासायनिक खतात मिसळून वापरू नयेत. जिवाणू खते शक्यतो ताजी असावीत. जिवाणू खते दिली तरी पिकांना रासायनिक खतांची योग्य मात्रा देणे आवश्यक आहे. जिवाणू खते विकत घेताना पाकिटावरील खताचे नाव, कोणत्या पिकासाठी वापरावे, निर्मात्याचे व पत्ता, उत्पादन तारीख, वापरण्याची अंतिम तारीख, बॅच नंबर आणि वापरण्याची पद्धती इत्यादी माहिती पाहून घ्यावी. जिवाणू खताचा वापर प्रामुख्याने बीज प्रक्रियेसाठी करावा.

उत्तम परिणाम मिळवण्यासाठी : बाजारातून जिवाणू खते आणताना त्यातून उपयुक्त जिवाणू प्रजाती संख्या असल्याची खात्री करावी. खात्रीलायक ठिकाणावरून खरेदी करावी, अन्यथा भेसळीची शक्यता असते. विविध जिवाणू खते एकत्र वापरण्यायोग्य असल्याची काळजी घ्यावी. वापरण्याची पद्धती, वेळ व प्रमाण पाकिटावर दिल्याप्रमाणे वापरावी. बीज प्रक्रिया करताना योग्य व चांगले स्टिकर (चिकट पदार्थ) वापरावेत. क्षारपड जमिनीत व इतर खराब झालेल्या जमिनीत वापर करावयाचा झाल्यास जिप्सम व वापरावे. स्फुरद व इतर अन्नद्रव्य पिकास योग्य प्रमाणात पुरवावे. जिवाणू खतातील जिवाणू अधिक कार्यक्षमतेने कार्य करण्यासाठी जमिनीत ओलावा आवश्यक आहे. जमिनीत जिवाणू मिसळताना किमान ५० किलो शेणखत किंवा गांडूळ खतात मिसळून द्यावे.

# गारपीटग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत द्या-खा.भगरे

नाशिक : नाशिक जिल्ह्यात झालेल्या पूर्वमोसमी पाऊस व गारपिटीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, बाधित शेतकऱ्यांना तातडीने नुकसान भरपाई देण्यात यावी, अशी मागणी खासदार भास्करराव भगरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

नैसर्गिक आपत्तीमुळे जिल्ह्यातील कांदा, द्राक्ष, गहू, डाळिंब तसेच भाजीपाला पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी शेतकऱ्यांचे संपूर्ण हंगामी उत्पन्न नष्ट झाले असून ते आर्थिक संकटात सापडले आहेत. आधीच वाढता उत्पादन खर्च, बाजारातील अस्थिरता आणि कर्जबाजारीपणामुळे त्रस्त असलेल्या शेतकऱ्यांसाठी ही आपत्ती अधिक गंभीर ठरली आहे. खासदार भगरे यांनी



निवेदनात नमूद केले आहे, की नुकसानग्रस्त भागात त्वरित व वस्तुनिष्ठ पंचनामे करून शेतकऱ्यांना तत्काळ आर्थिक मदत देण्यात यावी. तसेच पंचनाम्याची प्रक्रिया पूर्ण होण्याची वाट न पाहता अंतरिम मदत देणे गरजेचे असून नुकसान भरपाईचे दरही वाढवावेत, अशी त्यांनी मागणी केली आहे. यासोबतच पीक विमा दाव्यांची प्रक्रिया जलदगतीे पूर्ण करण्याचे निर्देश संबंधित यंत्रणांना द्यावेत, बाधित शेतकऱ्यांच्या कर्जफेडीस मुदतवाढ व व्याजमाफीचा विचार करावा, तसेच ज्या भागात नुकसान अधिक आहे त्या ठिकाणी विशेष मदत पॅकेज जाहीर करावे, अशीही मागणी केली आहे. दरम्यान, जिल्ह्यातील शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण असून शासनाकडून तातडीने दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. शेतकरी हा देशाचा कणा आहे. आज तोच संकटात सापडला असताना शासनाने तातडीने मदतीचा हात पुढे करणे अत्यावश्यक आहे. ही केवळ नैसर्गिक आपत्ती नसून शेतकऱ्यांच्या अस्तित्वाचा प्रश्न आहे,'' असेही भगरे यांनी नमूद केले आहे.

# जाणून घ्या मुरघास निर्मिती तंत्र

मुरघास खरे तर हि एक आंबवण्याची प्रक्रीया आहे . मुरघास म्हणजे हवा विरहीत जागेत किंनविकरण करून साठवलेला हिरवा चारा किंवा अगदी सोप्या भाषेत सांगावयाचे झाले तर हिरव्या चाऱ्याचा फारसा कस कमी न होऊ देता हवाबंद स्थितीत साठऊन ठेवण्याच्या पद्धतीस मुरघास असे म्हटले जाते. चारा साठवण्याच्या इतर काही पद्धतीमध्ये मुरघास हि एक महत्वाची पद्धत आहे , त्याच कारण अस कि पारंपारिक पद्धतीमध्ये चारा वाळऊन साठवला जातो. परंतु याद्वारे साठवलेल्या चाऱ्यातील पोषक द्रव्यांचा ऱ्हास मोठ्या प्रमाणावर झालेला दिसून येतो. मात्र मुरघास पद्धतीने साठवलेल्या चाऱ्यातील ऱ्हास अगदी कमी प्रमाणात होतो तसेच हा चारा जनावरे अगदी चवीने खातात.

मुरघास पासूनचे फायदे : आपली बरीचशी चारा पिके पावसावर येणारी असतात आणि आपल्याकडे बाराही महिने हिरवा चारा मिळण्यासाठी बागायतीची कमतरता आहे. त्यामुळे हिरव्या चाऱ्याचा तुटवडा उन्हाळ्यात भासतो. म्हनून हिरव्या चाऱ्यासारखा गुणवत्ता असणारा चारा म्हणजे मुरघास असल्याने दुभत्या जनावराना उत्पादन सातत्य राखण्यासाठी तो उपयोगी ठरतो. याचे फायदे सांगायचे झाले तर याद्वारे हिरवा चारा चांगल्या अवस्थेत दीर्घकाळ टिकूऊन ठेवता येतो. गवतासारख्यानिकृष्ठ वनस्पतीपासुनही चांगल्या प्रकारे मुरघास करता येतो. जास्त प्रक्षेत्रावरील पिक कमी जागेत साठून ठेवता येते, चारा पिक लवकर कापणी होत असल्यामुळे शेत दुसऱ्या पिकाकरीता मोकळे होते.मुरघास करण्यासाठी : साधारणपणे पिके निवड : चांगल्या प्रकारचा मुरघास तयार करण्यासाठी एकदल चारा पिके द्विदल चारा पिकापेक्षा अतिशय योग्य आहेत. कारण ज्या पिकांमध्ये साखरेचे प्रमाण जास्त असते त्या पिकांपासून अतिशय उत्कृष्ट मुरघास तयार होतो. यामुळे तृणधान्य पिके योग्य समजली जातात. त्यामध्ये मका आणि ज्वारी या पिकापासून उत्कृष्टमुरघास तयार होतो. याशिवाय बाजरी, संकरीत नेपियर,ओट याएकदलवर्गीय पिकापासून चांगला मुरघास तयार करता येतो. द्विदल चारा पिकापासुनही मुरघास तयार करता येतो पण त्यासाठी या पिकासोबत ५० टक्के एकदलवर्गीय पिक साठवावे लागते तसेच गुळाचा योग्य वापर आवश्यक असतो. योग्य मुरघास तयार करण्यासाठी चारा पिके ५० टक्के फुलोरा अवस्थेत असताना कापणी करावी लागते.

मुरघास तयार करण्याची पद्धती : मुरघास तयार करताना जमिनीत खड्डा करून किंवा जमिनीवर सायलो बंकरचे बांधकाम करून घ्यावे लागते. सध्या प्लास्टिक बॅगचा



वापर करून सुद्धा मुरघास तयार करता येतो. जमिनीमध्ये खड्डा करावयाचा असल्यास त्याचा आकार हा त्या ठिकाणची स्थानिक परिस्थिती, जमिनीतील पाण्याची पातळी आणि जनावरांची संख्या यावर अवलंबून असतो. खड्डा शक्यतो उंच जागेवर असला पाहिजे, म्हणजे पावसाचे पाणी त्यात झिरपणार नाही . खड्ड्याच्या भिंती सिमेंटने प्लास्टर करून हवाबंद कराव्यात किवा हे शक्य नसल्यास २०० मायक्रोन प्लास्टिक पेपर खड्ड्यात अंथरावा.त्यानंतर चार्याचे पिक फुलोऱ्यात आल्यावर कापणी करावी आणि चार ५ ते ६ तास सुकू द्यावा, म्हणजे त्यातील ओलाव्याचे प्रमाण ८० टक्के वरून ६० ते ६५ टक्के पर्यंत कमी होईल. त्यानंतर कुट्टी मशिनच्या सहायाने सुकवलेल्या चार्याची, एक इंच आकाराचे तुकडे होतील अश्या पद्धतीने कुट्टी क्कारून घ्यावी. त्यानंतर प्रती टन चाऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी १ किलो युरिया ,२ किलो गुळ, १ किलो मिनरल मिक्चर , १ किलो मीठ आणि १ लिटर ताक यांचे वेगवेगळे मिश्रण तयार करून त्याचे एकत्रित १० ते १५ लिटरचे द्रावण तयार करावे . त्यानंतर खड्यात कुट्टी भरण्यास सुरुवात करावी . चार ते सहा इंचाचा थर देऊन झाल्यावर त्यावर तयार केलेले मिश्रण शिपडावे. त्यानंतर थर चोपनीने किंवा धुमसणे चोपून चांगला दाबून घ्यावा , अश्या पद्धतीने थरावरथर देऊन खड्डा भरून घ्यावा म्हणजे त्यात हवा राहणार नाही. खड्डा जमिनीच्या वर १ ते १.५ फुट भरून प्लास्टिक कागदाने काळजीपूर्वक झाकून घ्यावा . त्यावर वाळलेले गवत, उसाचे पाचट, गव्हाचे काड टाकून त्यावर मातीचा थर देऊन खड्डा हवाबंद करावा. मुरघास तयार होण्यास ४५ ते ६० दिवस लागतात.

मुरघास चांगला तयार झाल्याचे गुणधर्म :

मुरघासाची प्रत कशी आहे हे आपण त्याचा वास, रंग आणि सामू यावरून ठवता येते. जर मुरघासास आंबट गोड दह्यासारखा वास येत असेल आणि रंग पिवळसर , फिक्कट हिरवा असल्यास उत्तम प्रकारचा मुरघास तयार झाला आहे असे समजावे. याशिवाय जर मुरघासाचा सामू ३.८ ते ४.२ दरम्यान असेल तर उत्तम प्रकारचा मुरघास तयार झाला आहे असे समजावे. पण मुरघासाचा वास कुजल्यासारखा आणि रंग काळसर झाला असेल तर मुरघास खराब झाला आहे असे समजून तो जनावरांना खाऊ घालू नये. उत्तम मुरघास तयार झाल्यानंतर ६ महिने ते एक वर्ष्यापर्यंत जनावरांना खाऊ घालता येतो.

जनावरांना मुरघास देण्याचे प्रमाण : पूर्ण वाढ झालेल्या दुभत्या जनावरास रोज १५ किलोपर्यंत मुरघास खाऊ घालावा. बैलांना ७ ते ८ किलो प्रती दिन, तसेच एक वर्षपेक्षा कमी वयाच्या वासरांना अर्धा किलो , शेळ्या मेंड्यांना दर रोज एक किलो मुरघास खाऊ घालावा.



राज्य लोकतंत्र
# मराठवाडा वृत्तांत
शुक्रवार दि. ०३ एप्रिल २०२६ ५



# ज्येष्ठ नागरिकास रिक्षात बसवून पैसे चोरी करणारे दोन आरोपी जेरबंद

जालना । प्रतिनिधी

फिर्यादी हे विघ्नहर्ता हॉस्पीटल ते मंठा चौफुली कडे जाणा-या एका रिक्षात बसुन मंठा चौफुली कडे जात असतांना रिक्षा चालक व रिक्षा मधील अज्ञात इसमांनी त्याचे खिशातील ५८५० रु रोख व फिर्यादीचे पत्नीचे आधारकार्ड चोरी केले म्हणून पोलीस ठाणे सदर बाजार येथे अज्ञात रिक्षा चालक व अज्ञात ३ इसमांविरुड गु.र.नं.२३९/२०२६ कलम ३०५(ब) भा.न्या.सं. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर प्रकरणी गुन्हा उघडकीस आणणेबाबत मा. पोलीस अधिक्षक श्री. अजय कुमार बन्सल यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव व पथकास सूचना दिल्या होत्या.



त्याअनुषंगाने सदर गुन्हयात वापरण्यात आलेल्या रिक्षाचा शोध ट्राफिक सी.सी.टी.व्ही. द्वारा तसेच गोपणीय माहिती घेता सदर रिक्षाचा क्र. २१ ०६६८ असले बाबत माहिती मिळुन आल्याने रिक्षा चालकाची माहिती घेचा सदर रिक्षा चालक हा शेख अस्लम शेख नसीर रा. इंदौरा नगर जालना हा असल्याचे निष्पन्न झाल्याने त्याचा शोध घेऊन त्यास ताब्यात घेतले असता सदर गुन्हयातील फिर्यादी यांनी त्याचे रिक्षा मधुन प्रवास केला बाबत त्याने कबुली दिली तसेच त्यावेळी त्याचे रिक्षा मध्ये त्याचा मित्र साथीदार नामे सोहेल शेख नूर रा. मिल्लत नगर जालना हा सोबत असले बाबत सांगितल्याने त्यास सुद्धा ताब्यात घेण्यात आले.

रिक्षा चालक नामे शेख अस्लम शेख नसीर रा. इंदोरा नगर जालना याचे ताब्यातुन ८०,००० रु. किंमतीची बजाज कंपनीची रिक्षा क्र. २१ ०६६८ ही जप्त करण्यात आली असून दोघांना रिपोर्टासह पोलीस ठाणे सदर बाजार येथे हजर करण्यात आले आहे. सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री. अजयकुमार बन्सल व मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. आयुष नोपाणी, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव, सपोनि सचिन खामगळ, पोउपनि राजेंद्र बाघ, पोलीस अंमलदार रमेश राठोड, प्रभाकर वाघ, सागर बाविस्कर, दत्ता वाघुंडे, इरशाद पटेल, संदीप चिंचोले, सतिष श्रीवास, रमेश काळे, सर्व स्था.गु.शा. जालना यांनी केली आहे

# सहायक पोलीस अधीक्षक जान्हवी शेखर यांनी ३१ लाख ६० हजाराचा मुद्देमालासह गुटखा पकडला



जालना । प्रतिनिधी

सहायक पोलीस अधीक्षक श्रीमती जान्हवी शेखर यांनी त्यांचे पथकासह सापळा रचुन जालना शहरामध्ये विक्री करीता आलेला ३१ लाख ६० हजार रुपयांचा गुटखा मुद्देमाल जप्त केला असुन त्याबाबत पोलीस ठाणे चंदनझिरा जालना येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सविस्तर वृत्त असे की, महाराष्ट्र राज्यात विक्री, वाहतुक, साठा करणे करीता प्रतिबंध करण्यात आलेला गुटखा जालना शहरामध्ये विक्री करीता आलेला असल्याची माहीती सहायक पोलीस अधीक्षक श्रीमती जान्ववी शेखर यांना मिळाली होती.

सदर माहीती वरुन सहायक पोलीस अधीक्षक जालना, त्यांचे पथक व पोलीस ठाणे चंदनझिरा जालना येथील पथक यांनी संयुक्तपणे कारवाई करुन छत्रपती संभाजीनगर रोडवर आय.टी.आय. कॉलेजच्या समोर एक आयशर ट्रक क्रमांक /०७//२८३७ हे अडवुन त्याची पंचांचे समक्ष पाहणी केली असता सदर आयशर ट्रक मध्ये राजनिवास पान मसाला, जाफरानी जर्दा या कंपनीचा एकुण २१ लाख साठ हजार रुपयांचा प्रतिबंधीत गुटखा व वाहतुक करणे करीता वापरण्यात आलेला १० लाख रुपये किंमतीचा आयशर ट्रक जप्त केला आहे. जप्त केलेल्या मालाबाबत अन्न व औषध प्रशासन अधिकारी यांनी तक्रार दिल्याने पोलीस ठाणे चंदनझिरा जालना येथे आयशर ट्रक चालक शकील आमीन पठाण रा. चंदनझिरा व ट्रकमध्ये असलेल्या प्रतिबंधीत मालाचा मालक सतिष जैस्वाल यांचे विरुध्द गुन्हा झालेला आहे. सदर कारवाई मा. पोलीस अधिक्षक श्री अजयकुमार बन्सल , मा. अपर पोलीस अधिक्षक श्री. आयुष नोपानी , यांच्या मार्गदर्शना खाली सहायक पोलीस अधीक्षक श्रीमती जान्हवी शेखर, उपविभागीय पोलीस अधीकारी श्री. अनंत कुलकर्णी, चंदनझिरा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री. बाळासाहेब पवार, पोउपनि निता दामधर, पोहेकों प्रशांत देशमुख, पोकों नवनाथ पाटील, पोहेकों राजेश काळे, शुभम तळेकर, जकी पठाण, शोभा राठोड यांनी केली आहे.

# कोयता गँग दोन तासात पोलिसांकडून जेरबंद

## ट्रॅव्हल्स गाडीच्या कोयत्याने काचा फोडून बॅटऱ्या चोरणारे तीन आरोपी ताब्यात

मंठा । प्रतिनिधी

मंठा पोलीस ठाणे हद्दीत विठ्ठल रुक्मिणी मंगल कार्यालयासमोर उभ्या असलेल्या ट्रॅव्हल्स वाहनाच्या कोयत्याने काचा फोडून बॅटरी चोरणाऱ्या आरोपीचा दोन तासात तपास करून चार पैकी तीन आरोपींना ताब्यात घेण्यात मंठा पोलिसांना यश आले असून फरार आरोपीचा शोध सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली. दि. ३१ मार्च २०२६ रोजी दुपारी २ वाजेच्या दरम्यान , मंठा शहरातील मंगल कार्यालयासमोर उभी असलेल्या ट्रॅव्हल्स गाडीच्या काचा कोयत्याने व दगडाने तोडून आणि गाडीतील दोन जुने बॅट-या चोरीला गेल्या असल्याची घटना घडली. याप्रकरणी प्रल्हाद श्रीमंतराव शिरसाट यांच्या फिर्यादीवरून मंठा पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला होता.महालक्ष्मी ट्रॅव्हल्स गाडी क्रमांक ०११८१३ च्या काचांचे नुकसान करून आणि चोरलेल्या वस्तूंचा मुद्देमाल घेऊन चोरट्यांनी फरार होण्याचा प्रयत्न केला. घटनेची माहिती मिळताच मंठा पोलिसांनी तात्काळ स्थानिक सीसीटीव्ही फुटेजचे विश्लेषण केले. त्यात गाडीच्या काचांचे नुकसान करणारे आणि चोरी करणारे चार अनोळखी व्यक्ती एका ब्लॅक स्कार्पीओ मधून आलेले दिसले. या फुटेजमधून स्पष्टपणे चार आरोपींच्या चेहऱ्याचे आणि गाडीचा नंबर देखील मिळाला. पोलिसांना प्राप्त झालेल्या गोपनीय माहितीनुसार, या चार आरोपींनी जालना शहरातील गांधी चौक परिसरात दहशत पसरवली होती आणि त्यांच्यापैकी तीन आरोपींना जालना येथून ताब्यात घेण्यात आले. संबंधित आरोपींनी चोरी केलेल्या बॅट-या आणि वापरलेली स्कार्पिओ पोलिसांना सापडली. आरोपींची चौकशी केली असता ओमकार भगवान काळे (वय २८, पाटोदा, ता. मंठा, जालना), अविनाश अंकुश वाघमारे (वय २५, माळीपुरा, गांधीचमन, जालना), वैभव सत्यप्रकाश गव्हाणे (वय १९, जालना) यांनी पोलिसांना चोरीची कबुली दिली असून, त्यांना मंठा पोलीस ठाण्यात आणून अटक केली आहे. याव्यतिरिक्त, चौकशीत अजून एक आरोपी, यशराज सतिश खांडेभराड (जालना) ह्या फरार असल्याची माहिती मिळाली असून त्याचा शोध घेण्यासाठी पोलिस पथक रवाना करण्यात आले आहे. मंठा शहरातील नागरिकांनी पोलिसांच्या कार्यक्षमतेचे कौतुक केले आहे.सदर कारवाई पोलिस अधीक्षक अजयकुमार बन्सल, अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, उपविभागीय पोलीस अधिकारी रामेश्वर रंगे यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस निरीक्षक पुरुषोत्तम देशमुख, सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश ईधाटे, पोलीस उपनिरीक्षक विठ्ठल केंद्रे आणि त्यांच्या पथकाने केली. पथकातील पोलीस हेडकॉंस्टेबल जगन्नाथ सुक्रे, पोलीस हेडकॉंस्टेबल कानबा हराळ, पोलीस हेडकॉंस्टेबल संतोष बनकर, पोलीस शिपाई आसाराम मदने यांचा या कार्यवाहीत सक्रिय सहभाग होता.

# महाराजस्व अभियानातून १३ हजार सेवा प्रदान

## महसूल विभागाचा पुढाकार ;जनतेचे जागेवर समाधान

जालना । प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीरांतर्गत महसूल विभागाकडून जिल्ह्यातील जनतेला महसूलविषयक १३ हजार ६९५ सेवा प्रदान करण्यात आल्या आहेत. जालना जिल्ह्यातील जनतेला जागेवरच सेवा प्रदान करताना हाती प्रमाणपत्र मिळाल्याने त्यांच्या चेहऱ्यावर समाधानाचे भाव होते. शासनाच्या मार्गदर्शनाखाली महसूल विभागातर्फे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर राबविण्यात येत आहे. या शिबिरांतर्गत जिल्ह्यातील ८ तालुक्यात मंडळनिहाय आतापर्यंत शिबीरे पार पडली आहेत. त्यामध्ये सातबारातील दुरुस्ती, डिजीटल सातबारा प्रदान करणे, ८-अ उतारा आणि विविध प्रमाणपत्रे जनतेला उपलब्ध करुन देण्यात आली आहेत.

सर्वसामान्य विद्यार्थ्यांना उत्पन्नाचा दाखला, नॉन-क्रिमीलेयर, राष्ट्रीयत्व, डोमेसाईल, वय, ज्येष्ठ नागरिक तसेच इतर प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले. महसूल कार्यालयात प्रलंबित असलेल्या सातबारावरील दुरुस्ती नागरिकांना शिबिरातून जागेवरच करुन देण्यात आली. तसेच डिजीटल सातबारा तसेच विविध प्रमाणपत्राचा लाभ घेणाऱ्यांची संख्या अधिक होती. याशिवाय शिबिरात अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांना जागेवरच प्रमाणपत्र देण्यात आले. एकूणच शिबिरात महसूल विभागाने घेतलेला पुढाकार बघता सहभागी झालेल्या जनता समाधानाने घराकडे परतली. एप्रिल मे मध्येही शिबिरे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरांतर्गत जालना जिल्ह्यात एप्रिल आणि मे मध्येही महसूल मंडळनिहाय शिबिरे घेण्यात येणार आहेत. या शिबिरातून जनतेला जागेवर जावून सेवा प्रदान करण्याचा जिल्हा प्रशासनाचा मानस आहे. जेणेकरुन जनतेला छोट्या-छोट्या कामांसाठी कार्यालयातील चकरा वाचतील. तसेच आर्थिक भार कमी होत वेळेचा अपव्यय टळणार आहे. तरी अधिकाधिक नागरिकांनी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीराचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले आहे. छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान टप्पा-१ महसूल प्रशासनातर्फे प्रदान सेवाशिबिर प्रमाणपत्र वाटप विशेष अर्थसहाय्य उपलब्ध करुन दिलेल्या डिजीटल ७/१२ ची संख्या उपलब्ध करुन दिलेल्या ८-अ उताऱ्यांची ची संख्या ७/१२ दुरुस्ती संदर्भात स्विकारण्यात आलेल्या अर्जाची संख्या अभियानातंर्गत निकाली काढण्यात आलेल्या फेरफाराची संख्याटप्पा-१५७२५,८५९,३०९४,२३७९,१०९५ ५४४ अशी एकूण संख्या आहे

# बीएसएनएल कर्मचाऱ्यांच्या वेतन पुनरीक्षणासाठी खा.कल्याण काळे यांचे केंद्रीय दूरसंचार मंत्र्यांना निवेदन

जालना । प्रतिनिधी

जालना लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. कल्याण काळे यांनी भारत संचार निगम लिमिटेड मधील कर्मचाऱ्यांच्या मागील नऊ वर्षांपासून प्रलंबित असलेल्या वेतन पुनरीक्षणाच्या प्रश्नाबाबत केंद्रीय दूरसंचार मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांना निवेदन सादर केले आहे. बीएसएनएल ही देशातील एक महत्त्वाची सार्वजनिक क्षेत्रातील दूरसंचार संस्था असून, ग्रामीण, दुर्गम व वंचित भागांमध्ये दूरसंचार सेवा पोहोचविण्यात तिची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण राहिली आहे. खासदार डॉ. काळे यांनी आपल्या निवेदनात नमूद केले आहे की, सुमारे ६० हजार बीएसएनएल कर्मचारी मागील जवळपास नऊ वर्षांपासून वेतन पुनरीक्षणापासून वंचित आहेत, ही अत्यंत गंभीर व अन्यायकारक बाब आहे.

केंद्र व राज्य शासन तसेच इतर सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांमध्ये नियमित वेतन पुनरीक्षण होत असताना बीएसएनएल कर्मचाऱ्यांवर होत असलेला हा भेदभाव त्यांच्या मनोबलावर विपरीत परिणाम करत असून त्यांच्या आर्थिक सुरक्षिततेलाही बाधा निर्माण करत आहे, असे त्यांनी अधोरेखित केले आहे. तसेच, ''अफोर्डेबिलिटी क्लॉज'' या अटीमुळे वेतन पुनरीक्षणास विलंब होत असल्याचे निदर्शनास आणून देत, या अटीची पुनर्समीक्षा करण्याची मागणी करण्यात आली आहे. बीएसएनएल ही केवळ व्यावसायिक संस्था नसून डिजिटल इंडिया, ग्रामीण कनेक्टिव्हिटी आणि सामाजिक समावेशनासाठी महत्त्वपूर्ण आधारस्तंभ असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. खासदार डॉ. काळे यांनी केंद्र सरकारने तात्काळ सकारात्मक निर्णय घेऊन बीएसएनएल कर्मचाऱ्यांना न्याय द्यावा, अशी ठाम मागणी केली आहे. या प्रश्नाचा संबंध केवळ वेतनाशी नसून लाखो कुटुंबांच्या जीवनमानाशी आणि भविष्यासोबत असल्याचे त्यांनी नमूद केले आहे

# भगवानगड परिसरात अवकाळीचा तडाखा

## शेतकरी शिवाजी खेडकर यांचे वीज पडून दुर्दैवी निधन

पाथर्डी प्रतिनिधी



पाथर्डी तालुक्यात दोन दिवसापासून अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावल्याने काहीसा जमिनीमध्ये गारवा निर्माण जरी झाला असला तरी अवकाळी पावसाने मात्र रब्बी हंगामातील काढायला आलेला गहू उन्हाळी बाजरी भुईमूग या पिकांचे नुकसान झाले असून अवकाळी पावसामुळे दोन दिवसापासून भगवानगड परिसरात विजेच्या कडकडासह पाऊस पडल्याने मालेवाडी येथील शेतकरी शिवाजी रघुनाथ खेडकर यांचे वीज पडून दुर्दैवी निधन झाले आहे अशा परिस्थितीत अवकाळी पावसामुळे पाथर्डी तालुक्यात मीरी करंजी तिसगाव कोरडगाव टाकळीमानुर या महसूल मंडळामध्ये झालेल्या पिकांचे नुकसान करून भरपाई देण्याचे मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

# स्व. कर्डीले यांच्या मुलाला भाजपची उमेदवारी

अहिल्यानगर । प्रतिनिधी

भाजप आमदार शिवाजी कर्डिले यांच्या निधनानंतर रिक्त झालेल्या राहुरी विधानसभा मतदारसंघात पोटनिवडणूक जाहीर झाली आहे. यासाठी भारतीय जनता पक्षाकडून शिवाजी कर्डिलेंचे सुपुत्र अक्षय कर्डिले यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. त्यांच्याविरोधात राष्ट्रवादी काँग्रेस : शरदचंद्र पवार पक्षाचे नेते प्राजक्त तनपुरे रिंगणात उतरण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

गेल्या वर्षी ऑक्टोबर महिन्यात ह्रदयविकाराच्या तीव्र धक्क्याने शिवाजी कर्डिले यांची प्राणज्योत मालवली. वयाच्या ६६ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. ते अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी विधानसभा मतदारसंघाचे आमदारपद भूषवत होते. त्यांनी सहावेळा आमदारकी भूषवलेली होती. मोठ्या आजारपणातून सावरल्यानंतर अचानक प्रकृती बिघडल्याने त्यांना रुग्णालयात नेण्यात आलं, परंतु तिथेच त्यांनी जगाचा निरोप घेतला. लोकप्रतिनिधीच्या निधनानंतर पोटनिवडणूक लागल्यावर, त्याच्या कुटुंबातील सदस्याला उमेदवारी दिली गेल्यास बिनविरोध निवडणूक करण्याची राजकीय संस्कृती महाराष्ट्रात जपली जात होती. मात्र गेल्या काळात या परंपरेला छेद दिल्याचं चित्र काही ठिकाणी पाहायला मिळालं आहे. प्राजक्त प्रसाद तनपुरे हे राहुरीतून अपक्ष रिंगणात उतरण्याची शक्यता आहे.दोन जागांवर पोटनिवडणूक : महाराष्ट्रातील बारामती आणि राहुरी यांसह देशभरातील आठ जागांवर पोटनिवडणूक घेण्यात येणार आहे. पोटनिवडणुकांसाठी सहा एप्रिलला अर्ज भरणे, माघारीची मुदत ९ एप्रिल आणि २३ एप्रिलला मतदान होईल. तर चार मे रोजी मतमोजणी होऊन निकाल जाहीर होईल.

जाहिर प्रगटन

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**

**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं.३०४/२०२५**
**डिगांबर किसन खंदारे विरुद्ध**
**ग्रामपंचायत कार्यालय कारेगव्हाण**

पहा

डिगांबर किसन खंदारे रा. कारेगव्हाण ता. जि. बीड

उपरोक्त प्रमाणे जन्ममृत्यु नोंद दावा प्रकरण विधिज्ञ मार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्मधारक समाधान किसन खंदारे यांचा दिनांक १५/०६/२००८ रोजी जन्म झालेला असून त्यांचे जन्माची नोंद जन्ममृत्यू नोंदवही मध्ये घेण्याबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरू आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की. सदरहून येस जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय /न.प कार्यालयस कारेगव्हाण ता. बीड येथील जन्म मृत्यू रजिस्टरला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदर होऊन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे कारेगव्हाण ता. जि. बीड येथील जन्ममृत्यू रजिस्टर ला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनाक २७/१०/२०२५ रोजी माझ्या सही शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख २७/११/२०२५ ही आहे

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार, बीड**

**जाहिर सूचना**

तमाम जनतेस या जाहिर सूचनेद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या मालमत्तेचे मूळ नोंदणीकृत विक्रीपत्र क्र.२०६३/१९९७ प्लॉट क्र.२९ सर्व्हे क्र.३४ तरफ गिराम नगर परिषद क्र. १-३-७७६ नगर रोड कसबे बीड ता. बीड जि. बीड हे दांगट सतिशराव राधाकृष्ण यांच्या नावे आहे, ते दिनांक २८/०२/२०२६ रोजी पेंडगांव बीड ते साक्षाळपिंप्री प्रवासा दरम्यान गहाळ झाले आहे.

याबाबतची तक्रार बीड ग्रामीण पोलीस स्टेशन येथे नोंद क्र.२१४३ दिनांक ०१/०३/२०२६ अन्वये नोंदवण्यात आली आहे.

सदर मूळ कागदपत्रांबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार, हक्क किंवा हितसंबंध असल्यास, त्यांनी ही सुचना प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत खालील पत्यावर किंवा संबंधित पोलीस स्टेशनला पुराव्यासह संपर्क साधावा. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास, कोणाचाही कोणताही हक्क नाही असे समजून मालक सक्षम प्राधिकाऱ्याकडून कागदपत्रांची प्रमाणित प्रत (Certified Copy) मिळविण्यासाठी पुढील कार्यवाही करतील.

मालमत्तेचा तपशिल :- नोंदणीकृत विक्रीपत्र क्र.२०६३/१९९७ प्लॉट क्र.२९ सर्व्हे क्र.३४ तरफ गिराम नगर परिषद क्र. १-३-७७६ नगर रोड कसबे बीड ता. बीड जि. बीड गट क्र./प्लॉट नं./मिळकत क्र. वार्ड क्र. १/ सर्वे नं.३४ प्लॉट क्र.२९ (घर क्र.१-३-९५३)

क्षेत्रफळ : १८०७ चौ. फुट

**ठिकाण : बीड**

**संपर्क : वकिलाचे नांव : ॲड.एम.आर. आर. उबाळे**

**पत्ता :- आदर्श गणेश नगर, नगर रोड, बीड**

**मोबाईल क्रमांक ९४२२७४४७२९**

# तथागत गौतम बुद्ध स्मारकासाठी जागा निश्चित करून कामाला गती मिळणार-जिल्हाधिकारी

जालना । प्रतिनिधी

शहरातील ऐतिहासिक मोती तलाव परिसरात तथागत गौतम बुद्ध स्मारक मूर्ती बसविण्याच्या दृष्टीने आज, दिनांक ०१ एप्रिल २०२६ रोजी प्रशासकीय व पदाधिकारी स्तरावर संयुक्त स्थळ पाहणी करण्यात आली. या पाहणीदरम्यान स्मारकासाठीची जागा निश्चित करण्यात आली असून, लवकरच पुढील नियोजनबद्ध कामाला सुरुवात करण्यात येणार आहे.याप्रसंगी जालना जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी तथा महानगरपालिका आयुक्त मा. सौ. आशिमा मित्तल, जालना शहराच्या महापौर मा. श्रीमती वंदना अरुण मगरे आणि उपमहापौर मा. श्री. राजेश राऊत यांची प्रमुख उपस्थिती होती.



शहराच्या सौंदर्यीकरणात भर घालणाऱ्या या स्मारकासाठी योग्य जागेची निवड करणे आवश्यक होते. त्याअनुषंगाने मोती तलाव परिसरातील उपलब्ध जागेची तांत्रिक आणि भौगोलिक पाहणी मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आली. यावेळी स्मारक समितीचे अध्यक्ष श्री. सुधाकर निकाळजे, महानगरपालिकेचे शहर अभियंता श्री. स. सऊद, कनिष्ठ लिपिक श्री. आनंद अंभोरे, मनपाचे वास्तुविशारद (आर्किटेक्ट) श्री. बनसोड, स्मारक समितीचे सदस्य श्री. धर्मा खिल्लारे यांच्यासह इतर मान्यवर व समिती सदस्य उपस्थित होते. जिल्हाधिकारी तथा आयुक्त सौ. आशिमा मित्तल यांनी तथागत गौतम बुद्ध मूर्ती परिसराच्या नियोजनाबाबत तांत्रिक सूचना दिल्या, तर महापौर श्रीमती वंदना मगरे यांनी या कामासाठी आवश्यक असलेला निधी आणि प्रशासकीय पाठपुरावा प्राधान्याने पूर्ण करण्यात येईल, असे आश्वासन दिले. तथागत गौतम बुद्ध यांच्या मुर्तीचे काम दर्जेदार आणि वेळेत पूर्ण करण्यासाठी महानगरपालिका प्रशासन आणि स्मारक समिती एकत्रितपणे प्रयत्नशील असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

# पावसाळ्यात अंत्यसंस्कारासाठी महासांगवीकरांची कसरत

## ग्रामस्थांची स्मशानभूमी व रस्त्याची जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्याकडे मागणी

पाटोदा । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील पाटोदा तालुक्यातील महासांगवी येथे मूलभूत सोयीसुविधांचा अभाव असल्याने ग्रामस्थांना मोठ्या हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. विशेषतः गावात स्मशानभूमी आणि तिथे जाण्यासाठी रस्ता नसल्याने, पावसामुळे एका वयोवृद्ध व्यक्तीचा अंत्यविधी चक्क दुसऱ्या दिवशी करण्याची दुर्दैवी वेळ ओढवली. या गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी ग्रामपंचायत महासांगवीच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन स्मशानभूमी व रस्त्याची मागणी करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, काल महासांगवी येथे एका वयोवृद्ध व्यक्तीचे निधन झाले. मात्र, गावात हक्काची स्मशानभूमी उपलब्ध नाही. त्यातच पावसाने हजेरी लावल्यामुळे आणि स्मशानभूमीकडे जाणाऱ्या रस्त्याची दुर्दशा झाल्यामुळे मृतदेहावर वेळेत अंत्यसंस्कार करणे अशक्य झाले. रस्ता चिखलमय झाल्याने आणि पावसापासून संरक्षणासाठी कसलीही शेड नसल्याने नातेवाईकांना व ग्रामस्थांना अंत्यविधीसाठी दुसऱ्या दिवसाची वाट पहावी लागली. या घटनेमुळे संपूर्ण गावात संताप आणि हळहळ व्यक्त केली जात आहे.




महासांगवी आणि कवडवाडी ग्रामपंचायतीच्या हद्दीत जनसुविधा किंवा इतर कोणत्याही शासकीय योजनेअंतर्गत तात्काळ स्मशानभूमी मंजूर करावी, असा ठराव ग्रामपंचायतीने घेतला आहे. सरपंच सौ. चैताली नामदेव सानप यांच्या स्वाक्षरीने जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांना हे विनंती पत्र देण्यात आले आहे. पत्रासोबत स्मशानभूमीच्या प्रस्तावित जागेचे आणि खराब रस्त्याचे फोटो देखील जोडण्यात आले आहेत, जेणेकरून प्रशासनाला परिस्थितीचे गांभीर्य लक्षात येईल.

''पावसाळ्यात कोणाचे निधन झाल्यास अंत्यविधी कुठे करायचा, हा प्रश्न आम्हाला दरवर्षी सतावतो. प्रशासनाने आता तरी आमची दखल घ्यावी आणि महासांगवी येथे तातडीने स्मशानभूमी व तिथे जाणारा रस्ता मंजूर करावा,'' अशी कळकळीची विनंती समस्त गावकरी आणि ग्रामपंचायत सदस्यांनी केली आहे. आता या संवेदनशील विषयावर जिल्हा प्रशासन किती तत्परतेने निर्णय घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. महासांगवीत स्मशानभूमीअभावी अंत्यसंस्कारासाठी कसरत; पाऊस थांबल्यानंतर दुसऱ्या दिवशी करावा लागला अंत्यविधी प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे ग्रामीण भागातील जनतेला आजही मूलभूत सुविधांसाठी किती संघर्ष करावा लागतो, याचे विदारक चित्र बीड जिल्ह्यातील पाटोदा तालुक्यातील महासांगवी येथे पाहायला मिळत आहे. गावात स्मशानभूमी आणि तिथे जाण्यासाठी रस्ता नसल्याने, पावसाच्या व्यत्ययामुळे एका मृतदेहावर चक्क दुसऱ्या दिवशी ◀◀ पान २ वर

# चमत्कार दाखवण्याच्या बहाण्याने अंगठी लांबवणारा चोरटा स्थानिक गुन्हे शाखेच्या जाळ्यात

बीड । प्रतिनिधी

चमत्कार दाखवतो असे सांगून एका वयोवृद्ध व्यक्तीची सोन्याची अंगठी लंपास करणाऱ्या सराईत चोरट्याला बीड स्थानिक गुन्हे शाखेने अटक केली आहे. पोलिसांनी या कारवाईत चोरी गेलेली अंगठी आणि गुन्ह्यात वापरलेली मोटारसायकल जप्त केली आहे.

केज तालुक्यातील काशीदवाडी येथील रहिवासी भीमा सोनाजी जाधवर (वय ५८ वर्षे) हे १ फेब्रुवारी २०२६ रोजी उपचारासाठी पुणे येथे जाण्याकरिता केज बस स्थानकावर बसची वाट पाहत थांबले होते. यावेळी दोन



अनोळखी व्यक्तींनी त्यांच्याशी संवाद साधला आणि ''तुम्हाला चमत्कार पाहायचा आहे का?'' अशी विचारणा केली. भामट्यांनी जाधवर यांची ६ ग्रॅमची सोन्याची अंगठी काढून ती एका पांढऱ्या रुमालात ठेवल्याचे भासवले. ''दहा मिनिटे डोळे बंद करा, मग बघा काय चमत्कार होतो,'' असे सांगून चोरट्यांनी त्यांची अंगठी लंपास केली व तेथून पसार झाले.

सीसीटीव्ही फुटेज ठरले मोलाचे:

याप्रकरणी केज पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला होता, ज्याचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखा करत होती. पोलीस उपनिरीक्षक महेश विघ्ने यांच्या पथकाने घटनास्थळाला भेट देऊन सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली. तपासादरम्यान ◀◀ पान २ वर

# बीड शहरातील सिग्नल सुरु होण्यापूर्वीच कोसळले बीड बस स्थानकही पहिल्याच पावसात गळू लागले

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील साठे चौक छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळ तसेच नगर नाक्यावर तीन ठिकाणी नवीन सिग्नल बसवण्यात आले होते. या सिग्नलचे काम अजून पूर्णही झाले नाही. मात्र एक एप्रिल रोजी झालेल्या अवकाळी पावसात नगर नाक्यावरील सिग्नल कोसळले. थातूरमातूर आणि बोगस काम करणाऱ्या या कंत्राटदारावर कारवाई करण्याचा इशारा नगरपालिका प्रशासनाने दिला असल्याचे समजते. एवढेच




नव्हे तर बीड शहरांमध्ये नव्यानेच बांधण्यात आलेले बस स्थानकही पहिल्याच अवकाळी पावसामध्ये गळू लागल्याने प्रवाशांची तारांबळ उडाली. या गुत्तेदारांवरही कारवाई करून हे थातूरमातूर केलेले काम पुन्हा करावे अशी अपेक्षा प्रशासनाकडून केली जात आहे.

बीड शहरामध्ये यापूर्वीही सिग्नल बसवण्यात आले होते. मात्र कालांतराने हे सिग्नल कुठे गेले हे नगरपालिकेलाही माहीत नाही. सिग्नल बंद पडल्यानंतर त्याची दुरुस्ती करण्यात आली नाही. आता नगरपालिकेमध्ये नवीन नगराध्यक्षाची सत्ता आल्यानंतर ◀◀ पान २ वर

# बैलगाडा स्पर्धेत सौताड्याच्या शंभूचा दबदबा; अविनाश शिंदे यांचा प्रथम क्रमांक

पाटोदा । प्रतिनिधी

श्री ढगेश्वर यात्रेनिमित्त आयोजित ''श्री ढगेश्वर केसरी २०२५ एक दुजा एक बैल'' या भव्य बैल स्पर्धेत सौताडा (ता. पाटोदा, जि. बीड) येथील अविनाश शिंदे यांच्या ''शंभू ०७'' या बैलाने शानदार कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला. या विजयानंतर त्यांना ३१,००० रुपयांचे बक्षीस प्रदान करण्यात आले.

दि. १ एप्रिल २०२५ रोजी सकाळी थेटवाडी येथे झालेल्या या स्पर्धेत राज्यभरातील अनेक स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. अत्यंत चुरशीच्या झालेल्या या स्पर्धेत शंभूने वेग, ताकद आणि नियंत्रण यांचा उत्कृष्ट संगम दाखवत



सर्वांना मागे टाकले.

या स्पर्धेतील इतर विजेत्यांनाही अनुक्रमे २१,०००, १५,०००, ११,०००, ९,०००, ७,००० व ५,००० रुपये अशी बक्षिसे देण्यात आली. कार्यक्रमाचे आयोजन राजमाता युवा प्रतिष्ठान व ढगेश्वर यात्रा समिती, थेटवाडी यांच्या वतीने करण्यात आले होते. दरम्यान, सौताडा गावासाठी हा अभिमानाचा क्षण ठरला. गावातील अविनाश शिंदे यांनी प्रथमच ही प्रतिष्ठेची बैलगाडा शर्यत जिंकल्यामुळे सौताडा येथे त्यांच्या आणि शंभूच्या विजयाची भव्य मिरवणूक काढण्यात आली. गावकऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत जल्लोष साजरा केला. यावेळी पाटोदा बाजार समितीचे सभापती किरण शिंदे पाटील यांनी अविनाश शिंदे यांचा सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या यशामुळे संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण असून, शंभूच्या कामगिरीची सर्वत्र चर्चा सुरू आहे.



# उपप्रादेशिक परिवहन कार्यालय अंबाजोगाई –नवीन जागेत जाणार

अंबाजोगाई । प्रतिनिधी

उप प्रादेशिक परिवहन कार्यालय (आर. टि ओ. ऑफिस) हे दि ६ एप्रिल २६ रोजी सोमवार पासून लातूर- लोखंडी रोड वरील शासकीय जागेत स्थलांतरित होत आहे .

लोखंडी येथील कोविड सेन्टर जवळ शासकीय बांधकाम असलेल्या ठिकाणी जात असून कार्यालयीन कामासाठी सर्वांनी आता पूर्वीच्या जोगाईवाडी येथे न येता नवीन ठिकाणी यावे असे उपप्रादेशिक कार्यालय अंबाजोगाई यांच्या कडून कळविण्यात आले आहे.

# वैराग्याचे मूर्तिमंत रूप शांतीब्रम्ह नवनाथ बाबा - ह. भ. प. गोपाळ महाराज थोटे

### श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे पौर्णिमा निमित्त कीर्तन व महाप्रसाद

बीड । प्रतिनिधी

श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे चैत्र पौर्णिमेच्या निम्मित गुरुवर्य शांतीब्रम्ह नवनाथ बाबा महाराज मठाधिपती महंत श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुवारी ह भ प गोपाळ महाराज थोटे यांचे सुश्राव्य कीर्तन सेवा संपन्न झाले

अभंग विवेचन करताना थोटे महाराज यांनी संताच्या ठाई वैराग्य असते; धन, सत्ता, संपत्ती, मान, सन्मान ज्यांच्या साठी माती समान



असते तेच खरे वैराग्यवंत;आज वैराग्याचे मूर्तिमंत रूप म्हणजे श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथील शांतीब्रम्ह नवनाथ बाबा महाराज हे होय असे अभंग विवेचनात ह भ प थोटे महाराज यांनी भावना व्यक्त केली. शांतीब्रह्म एकनाथ महाराज नंतर शांतीब्रम्ह हि उपाधी खरोखर दोन संतानी जपली व त्याचं शोभून दिसते ते म्हणजे आळंदीचे ह भ प कुरे महाराज व श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथील शांतीब्रम्ह नवनाथ बाबा महाराज हे होय असे थोटे महाराज यांनी सांगितले. मनुष्य ◀◀ पान २ वर

# वडवणीत श्री.हनुमान जन्मोत्सव हर्षोल्हासात साजरा

## हजारो भाविकांची उपस्थिती –महाप्रसादाचाही घेतला लाभ

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी शहरातील मोठा मारोती मंदिर याठिकाणी काल दि.२ एप्रिल २०२६ गुरुवार रोजी श्री.हनुमान जन्मोत्सव मोठ्या हर्षोल्हासात व उत्साही वातावरणात भक्तीभावाने साजरा करण्यात आला. सकाळी ठीक सव्वा सहा वाजता सूर्योदयाबरोबर मारोतीरायाचा हा जन्मोत्सव सोहळा संपन्न झाला. त्यानंतर संपूर्ण शहरातून पालखी मिरवणूक काढण्यात आली व याप्रसंगी आयोजित करण्यात आलेल्या महाप्रसादाचाही हजारो भाविकांनी




मनमुराद लाभ घेतला.

वडवणी येथील यंदाचा श्री.हनुमान जन्मोत्सव काहीसा आगळावेगळा होता. कारण मंदिराच्या मनमोहक व आकर्षक अशा सुशोभीकरणानंतर हा पहिलाच हनुमान जन्मोत्सव साजरा करण्यात येत होता. त्याचबरोबर याठिकाणी प्रथमच कढी, भात, लापशी अशा महाप्रसादाचेही हजारो भाविक भक्तांसाठी आयोजन करण्यात आलेले होते. यामुळे यंदाचा हा हनुमान जन्मोत्सव आगळावेगळा तर ठरलाच शिवाय भाविकांच्या उपस्थितीमध्येही मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे दिसून आले. गुरुवारी सकाळी ठीक सव्वा सहा वाजता सूर्योदयाबरोबर याठिकाणी हनुमान जन्मोत्सव संपन्न झाला. याप्रसंगी ◀◀ पान २ वर

# पाटोद्याचा गुटखा किंग नळदुर्गमध्ये पकडला

## नळदुर्ग बायपासवर पोलिसांनी ४८ लाखांचा गुटखा पकडला; पोलिसांना धमकी देणाऱ्या चौघांविरुद्ध गुन्हा दाखल

पाटोदा । प्रतिनिधी

राज्यात प्रतिबंधित असलेल्या गुटख्याची मोठी खेप घेऊन जाणाऱ्या बीड जिल्ह्यातील पाटोदा येथील 'गुटखा किंग'च्या टोळीचा नळदुर्ग पोलिसांनी यशस्वीरित्या 'गेम ओव्हर' केला आहे. नळदुर्ग बायपास रोडवर केलेल्या धडक कारवाईत पोलिसांनी तब्बल ४८ लाख ४२ हजार ५०० रुपये किमतीचा 'गोवा गुटखा' जप्त केला असून, या टोळीतील चौघांना बेड्या ठोकल्या आहेत.

२७ मार्च २०२६ रोजी सकाळी सव्वा नऊच्या सुमारास, नळदुर्ग पोलीस ठाण्याचे अंमलदार दत्तात्रय कुंभार आणि त्यांचे पथक बायपास रोडवरील 'निसर्ग हॉटेल' जवळ कर्तव्यावर होते. यावेळी एका संशयास्पद आयशर टेम्पो (क्र. १६ २३९५) ला थांबवून झडती घेतली असता, त्यात महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेल्या 'गोवा गुटख्या'च्या ५० मोठ्या गोण्या आढळून आल्या.

''तुला बघून घेतो'' पोलिसांनाच दिली धमकी!

कारवाई सुरू असताना, स्वतःच्या फायद्यासाठी मानवी आरोग्यास घातक गुटख्याची तस्करी करणाऱ्या या आरोपींनी पोलिसांवर दबाव टाकण्याचा प्रयत्न केला. ''गाडी सोडून दे, तू कशी काय कारवाई करतो ते तुला बघून घेतो,'' अशी थेट धमकी पोलिसांना देण्यात आली. मात्र, पोलिसांनी न डगमगता आरोपींना ताब्यात घेऊन सर्व मुद्देमाल जप्त केला.

जप्त केलेला मुद्देमाल आणि वाहने:

मुद्देमाल: ५० मोठ्या गुटख्याच्या गोण्या (किंमत ◀◀ पान २ वर

# हायटेक सिग्नल की हायटेक भ्रष्टाचार ? सुरू होण्यापूर्वीच कोसळले बीडकरांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर ! कारवाईची मागणी

बीड । प्रतिनिधी

शहरातील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी मोठ्या गाजावाज्यात बसविण्यात आलेले ६४ लाख रुपये खर्चाचे हायटेक सिग्नल सुरू होण्यापूर्वीच कोसळल्याने कामाच्या दर्जावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. संबंधित ठेकेदार व अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांनी केली आहे.

जिल्हा नियोजन समितीच्या विशेष निधीतून अण्णाभाऊ साठे चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, नगर नाका परिसर आणि शिवराज पान सेंटर चौक या चार ठिकाणी प्रत्येकी १६ लाख रुपये खर्चून सिग्नल बसविण्यात आले होते. मात्र नगर नाका परिसरातील सिग्नल अवकाळी पावसाच्या तडाख्यात कोसळल्याने संपूर्ण प्रकल्पाच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. यापूर्वीही लाखो रुपये खर्चून बसविण्यात आलेले सिग्नल देखभाल अभावी निष्प्रभ ठरले आहेत. त्यामुळे नव्याने बसविण्यात आलेले हायटेक सिग्नल तरी टिकणार का, असा सवाल उपस्थित होत आहे.

डॉ. ढवळे यांनी जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक व नगरपरिषद मुख्याधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात संबंधित दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. ''हायटेक सिग्नलमुळे वाहतुकीला शिस्त लागेल; पण निकृष्ट काम करणाऱ्यांना कोण शिस्त लावणार?'' असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

या सिग्नलचे वैशिष्ट्य म्हणजे संपूर्ण पोलच लाल, पिवळा व हिरवा रंग दाखवतो, त्यामुळे वाहनचालकांना दूरवरून सिग्नल स्पष्ट दिसतो. तसेच 'स्मार्ट टाइम मॅनेजमेंट' तंत्रज्ञानामुळे ज्या बाजूला वाहनांची गर्दी अधिक असेल, त्या दिशेला हिरवा दिवा जास्त वेळ दिला जातो. मात्र प्रत्यक्षात सिग्नल कोसळल्याने या योजनेची विश्वासार्हता संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे.

सर्वेसर्वा आ.विजयसिंह पंडित यांनी लक्ष द्यावे :- डॉ.गणेश ढवळे

बीड नगरपरिषद ताब्यात आणण्यासाठी आ . विजयसिंह पंडित यांचा सिंहाचा वाटा असल्याचे सत्ताधारी नगरसेवक वारंवार सोशल मीडिया आणि दैनिकात बातम्या प्रसारित करताना उल्लेख करतात. आ.विजयसिंह पंडीत यांनी सुद्धा मागील ४० वर्षांपासून नगरपरिषदेत सुरू असलेला अनागोंदी कारभार आपण संपुष्टात आणण्यासाठी प्रयत्नशील असुन बीडकरांना दिलासा देण्याबाबत वारंवार अधोरेखित केले आहे. त्यामुळे ◀◀ पान २ वर

# मोठेवाडीत भक्तीमय वातावरणात हनुमान जयंती साजरी

माजलगाव । प्रतिनिधी

संकटमोचन, बलोपासनेसह बुद्धीची देवता म्हणूनही ज्याकडे पाहिले जाते अशा महाबली हनुमानाची जयंती माजलगांव तालुक्यातील मोठेवाडी येथील काळा हनुमान मंदिर व लाल हनुमान मंदिरात मोठ्या उत्साहात साजरी झाली. पवनपुत्र हनुमान की जय, संकटमोचन हनुमान की जय, अशा घोषणांनी मोठेवाडी दुमदुमून गेली होती. पहाटेपासूनच भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती.



हनुमान मंदिरात हनुमान चालिसा पठण, स्तोत्र पठण, महाआरती, पुरोहित सुनील नाना जोशी यांच्या वेद मंत्र घोषाने महारुद्र अभिषेक सोहळा संपन्न झाला. पहाटेपासून विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. फुलांनी सजविलेली पालखी, जन्मकाळ सोहळा, सुंठवडा वाटप आणि हनुमान स्तोत्र अशा भक्तिपूर्ण वातावरणात हनुमान जयंती साजरी करण्यात आली. भाविकांनी श्री हनुमंताला रुईचा हार, पंचामृत आणि तेल वाहिले. या हनुमान जयंती निमित्त विष्णु खेत्री, गोरख चव्हाण यांनी महाप्रसादाचे आयोजन केले होते.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# गाडीला कट मारला' या कारणावरून तमाशा कलावंतांना मारहाण, चौघांना अटक; ४ दिवसांची पोलीस कोठडी

नारायणगाव : नारायणगाव येथील विठाबाई भाऊ मांग नारायणगावकर या तमाशाच्या कलावंताना माळेगाव पठार येथे तमाशा कार्यक्रमासाठी निघाले असता रस्त्यात गाड्या अडवून लाथा-बुक्क्या व काठीने बेदम मारहाण करण्यात आली. महिला कलावंताचे कपडे फाडून लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन केले. या प्रकरणी घारगाव पोलिसांनी चार जणांवर गुन्हा दाखल करून अटक केली आहे. न्यायालयापुढे हजर केले असता त्यांना चार दिवसाची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे, अशी माहिती घारगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक हेमंत थोरात यांनी दिली.



या प्रकरणी फड मालक कैलास मारुती सावंत (वय ५९, रा. नारायणगाव, ता. जुन्नर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून सुमित शांताराम गुंजाळ, संकेत शांताराम बांगर, सोमेश सुखदेव बोंबले, दत्तात्रय रावसाहेब पडवळ (सर्व रा. वरुडी पठार, ता. संगमनेर) यांना अटक करण्यात आली आहे.

विठाबाई नारायणगावकर या तमाशाचा कार्यक्रम १ एप्रिल रोजी माळेगाव पठार (ता. संगमनेर) येथे होता. या कार्यक्रमासाठी फडातील १६ महिला, ४४ पुरुष कलावंत व कामगार बस व ट्रकमधून निघाले होते. दरम्यान दुपारी २ वाजण्याच्या सुमारास पुणे-नाशिक महामार्गावरील वरुडी पठार येथे आमच्या गाडीला कट का मारला? या कारणावरून आरोपींनी तमाशाची चार वाहने अडवली. आरोपींनी चालक प्रकाश औटी, विकास जठार यांना काठी व लाथा-बुक्क्यांनी मारहाण केली. त्यानंतर बसमधील महिला कलावंत अक्षरा शामिल शिंदे, आरुषी सुमित काळे, संध्या राम चौघुले, शामिल अतुल शिंदे यांच्यासह गणेश शिवाजी गायकवाड, राम बशीरुध्दीन चौगुले, अजित वाळुंज यांना काठी व लाथा-बुक्क्यांनी बेदम मारहाण केली. महिलांशी अश्लील वर्तन करून त्यांचे कपडे फाडले. महिला कलावंतांच्या पोटात व छातीवर लाथा मारून लज्जा होईल, असे वर्तन केले. यामध्ये तीन कलावंत गंभीर जखमी झाले आहेत. याप्रकरणी कैलास सावंत यांनी दिलेल्या तक्रारीवरून आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी ठाणे अंमलदार एकनाथ खाडे तपास करत आहेत.दरम्यान नारायणगाव ही तमाशाची पंढरी असून या तमाशा पंढरीची ओळख या कलावंतांमुळे महाराष्ट्रभर झाली आहे. यात्रांच्या निमित्ताने तमाशाच्या कार्यक्रमातून समाज प्रबोधनाचे काम करणाऱ्या कलाकारांना अशी मारण होणं उचित नाही. या घटनेचा निषेध असून मारहाण करणाऱ्यांना कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते सुरज वाजगे यांनी केली आहे.

# पुण्यात अनधिकृत फायबर केबलवर धडक कारवाई; दोन ट्रकभर केबल हटवली

पुणे । प्रतिसनिधी

शहरात मोठ्या प्रमाणात पसरलेल्या अनधिकृत ऑप्टिकल फायबर केबलच्या जाळ्यावर अखेर महापालिकेने कारवाईचा बडगा उगारत एक




एप्रिलपासून धडक मोहीम सुरू केली आहे. सातारा रस्त्यावर गुरुवारी सकाळी महापालिकेच्या विद्युत विभागासह विविध विभागांच्या संयुक्त पथकाने पोलिस बंदोबस्तात कारवाई करीत अनधिकृत केबल हटवण्यास सुरुवात केली. या कारवाईत पहिल्याच दिवशी दोन ट्रकभर केबल काढण्यात आल्याने प्रशासनाच्या भूमिकेची तीवता स्पष्ट झाली.

शहरातील उड्डाणपूल, रस्त्यांच्या कडेला असलेले वृक्ष, पथदिवे, सिग्नल, बसथांबे, तसेच खासगी व सरकारी इमारतींवरून अनधिकृत केबलचे जाळे मोठ्या प्रमाणात पसरलेले आहे. या केबलमुळे अपघातांचा धोका वाढत असून, महापालिकेचा महसूलही बुडत असल्याचे चित्र समोर आले आहे. मागील वर्षी या विरोधात कारवाई सुरू करण्यात आली होती; मात्र काही काळानंतर ती थंडावली होती. अलीकडेच स्थायी समितीच्या बैठकीनंतर या प्रश्नावर पुन्हा लक्ष केंद्रित करीत कारवाईला वेग देण्याचा निर्णय घेण्यात आला.त्या अनुषंगाने एक एप्रिलपासून नियमित कारवाई सुरू करण्याची घोषणा करण्यात आली होती. त्यानुसार बुधवारी सकाळी साडेदहा वाजल्यापासून सातारा रस्त्यावरील आदिनाथ सोसायटीसमोर कारवाईला सुरुवात करण्यात आली. या मोहिमेत स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले, विद्युत विभागाच्या प्रमुख मनीषा शेकटकर, अतिक्रमण विभागाचे प्रमुख सोमनाथ बनकर, अग्निशामक दलाचे प्रमुख देवेंद्र पोटफोडे, तसेच कार्यकारी अभियंता नीलेश कालेकर आदी उपस्थित होते.आदिनाथ सोसायटी, पुष्प मंगल कार्यालय परिसर, उत्सव इमारत, राजर्षी शाहू महाराज सोसायटी, पुण्याई नगर आणि धनकवडी परिसरात ही कारवाई राबविण्यात आली. अनधिकृत केबलमुळे नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण होतो आणि महापालिकेचा महसूलही बुडतो, याकडे लक्ष वेधत संपूर्ण शहरात ही मोहीम अधिक वेगाने राबवली जाईल, असे स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी सांगितले.

# आळंदीत ६ वर्षांच्या चिमुरडीचा गळा आवळला, ७९ वर्षीय वृद्ध महिलेलाही वार करुन संपवलं

आळंदी । प्रतिनिधी

वारकरी संप्रदायाची पावन नगरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आळंदीत एक धक्कादायक घटना घडली आहे. केळगाव-हनुमानवाडी येथील ठाकरवाडी येथे एका ६ वर्षांच्या चिमुरडीची गळा आवळून, तर तिला सांभाळणाऱ्या ७९ वर्षीय वृद्ध महिलेची डोक्यात वार करून निर्घृण हत्या करण्यात आली आहे. काल (बुधवारी, ता १) मध्यरात्रीच्या सुमारास ही घटना घडली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, हनुमानवाडी येथील रहिवासी संगीता दत्तात्रय गवारी या नेहमीप्रमाणे केळगाव येथील इंद्रायणी कॅन्सर हॉस्पिटलमध्ये हाऊस कीपिंगच्या कामासाठी रात्रपाळीला गेल्या होत्या. घरी त्यांची नात धनश्री सोनू दत्तात्रय केदारी (वय ६ वर्षे) आणि तिला सांभाळण्यासाठी शेजारी राहणाऱ्या मंगल शिंदे (वय ७९ वर्षे) या दोघीच होत्या. मध्यरात्री अज्ञात इसमाने घरात शिरून गाढ झोपेत असलेल्या धनश्रीचा गळा आवळला, तर मंगल शिंदे यांच्या डोक्यावर गंभीर वार करून दोघांचीही हत्या केली.

गुरुवारी सकाळी संगीता गवारी या कामावरून घरी परतल्यानंतर हा भीषण प्रकार उघडकीस आला. रक्ताच्या थारोळ्यात पडलेला मृतदेह पाहून त्यांनी आरडाओरडा केला, त्यानंतर स्थानिक नागरिकांनी तातडीने पोलिसांना पाचारण केले. घटनेची माहिती मिळताच आळंदी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. या दुहेरी हत्याकांडामागील नेमका उद्देश काय ? चोरीच्या उद्देशाने हा हल्ला झाला की काही जुन्या वादातून, याचा तपास पोलीस करत आहेत. या घटनेमुळे आळंदी आणि परिसरात तीव्र संताप व्यक्त होत असून, आरोपींना कठोर शासन करण्याची मागणी ग्रामस्थांकडून केली जात आहे.

या दुहेरी हत्याकांडामुळे आळंदी परिसरात भीती आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे, वारकरी संप्रदायाची पावन नगरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आळंदीत अशा प्रकारची क्रूर घटना घडल्याने नागरिकांमध्ये अस्वस्थता वाढली आहे. परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करण्यासोबतच संशयितांचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी विशेष पथके तयार केली असून, आरोपीचा लवकरात लवकर माग काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत.दरम्यान, या घटनेमागे चोरीचा हेतू होता की पूर्ववैमनस्यातून हा प्रकार घडला, याचा सखोल तपास सुरू आहे. स्थानिक नागरिकांनी पोलिसांकडे सुरक्षाव्यवस्था वाढवण्याची मागणी केली असून, अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी कठोर उपाययोजना करण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

# धागंवडीत रंगला अडबलसिद्धनाथांचा गाडेबगाड सोहळा

भोर । प्रतिनिधी

भोर तालुक्यातील धागंवडी येथे गुरुवारी (दि. २) पांडवकालीन श्री अडबलसिद्धनाथ गाडेबगाड यात्रा उत्सव मोठ्या उत्साहात पार पडला. चैत्र शुक्ल पक्ष पौर्णिमा अर्थात हनुमान जयंतीनिमित्त होणाऱ्या या उत्सवासाठी पुणे, सातारा, धाराशिव जिल्ह्यांसह पंचक्रोशीतील भाविकांनी मोठी गर्दी केली होती.



दुपारी साडेचार वाजता निगडे गावातील म्हखाळेदेवीची पालखी धागंवडी येथे आगमन झाल्यानंतर गाडेबगाड सोहळ्याला सुरुवात झाली. ढोल-ताशे, ब्याडबाजा आणि फटाक्यांच्या आतषबाजीच्या गजरात गाडेबगाड गावातून निघाला.


१२ बैलांच्या सहाय्याने दीड किलोमीटर अंतरावर असलेल्या श्री अडबलसिद्धनाथ मंदिरापर्यंत गाडेबगाड ओढत नेण्यात आला. यावेळी गाडेबगाडावरील दोन मानकऱ्यांना पारंपरिक पद्धतीने फिरवत मंदिरात नेऊन दर्शन घडविण्यात आले.

दरम्यान, पुणे-सातारा महामार्गावरून गाडेबगाड मंदिराकडे जात असताना राजगड पोलीस व सारोळा महामार्ग वाहतूक पोलिसांनी वाहतूक सुरळीत ठेवत नियोजन केले. काही काळ वाहतूक थांबविण्यात आल्याने प्रवाशांनीही गाडेबगाड सोहळ्याचे दर्शन घेतले. या सोहळ्यास पंचक्रोशीतील मान्यवर, ग्रामस्थ तसेच भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पारंपरिक उत्साह, श्रद्धा आणि सांस्कृतिक वारसा जपत धागंवडीतील हा गाडेबगाड उत्सव भक्तिमय वातावरणात पार पडला. धांगवडी येथील श्री अडबलसिद्धनाथ हे प्राचीन व जागृत देवस्थान मानले जाते. भाविकांच्या मनोकामना पूर्ण होतात, अशी श्रद्धा असल्याने दर रविवारी तसेच यात्रोत्सवाच्या काळात येथे मोठी गर्दी होत असल्याची माहिती पुजारी गोविंद मांडके यांनी दिली.

# एकनाथ शिंदेंचा ओएसडी असल्याचे सांगत पुणे पोलिसांची दिशाभूल; हिंजवडीतील आरोपी ताब्यात, गुन्हा दाखल

पुणे । प्रतिनिधी

राज्यातील मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री किंवा



विविध खात्याच्या मंत्र्यांच्या कामकाजासाठी ओएसडींची नियुक्ती केली जाते. अनेकदा हे विशेष कार्यकारी अधिकारी ही खासगी सचिव म्हणून देखील कार्य करतात. अर्थातच मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांच्या ओएसडींची संख्या अधिक असल्याने अनेकजण त्या पदाचा धाक दाखवून शासकीय विभागात कामे करतात. मात्र, पुण्यात एका तथाकथित ओएसीडीचा भांडाफोड झाल्याचं समोर आलं आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यालयातील अधिकारी असल्याचे भासवून पुणे पोलिसांची दिशाभूल करण्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतले असून त्याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रद्युम्न श्रीहरी पाटील (वय ४७,रा.हिंजवडी) असे आरोपीचे नाव आहे. त्याने स्वतःला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यालयातील अधिकारी असल्याचे सांगत पुण्यातील परिमंडल एकचे पोलीस उपायुक्त ऋषिकेश रावले यांच्या कार्यालयात थेट प्रवेश केला. पुणे पोलिसांची दिशाभूल केल्याप्रकरणी पोलिसांनी संबंधित तथाकथित ओएसडीला ताब्यात घेत त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# कलादालन फाउंडेशनच्या वतीने रक्तदान व मोफत आरोग्य शिबिर उत्साहात संपन्न

पुणे । प्रतिनिधी

सामाजिक बांधिलकी जपत Lotus Landmarks प्रस्तुत कलादालन फाउंडेशनच्या वतीने ३१ मार्च २०२६ रोजी कोथरूड परिसरातील Lotus -man येथे रक्तदान शिबिर व मोफत आरोग्य तपासणी शिबिर यशस्वीरित्या पार पडले.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. यावेळी सहव्यवस्थापकीय संचालिका स्मिता सत्यप्रभा गिरी तसेच चेअरमन दातार यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

या उपक्रमामागील प्रमुख उद्देश समाजामध्ये आरोग्याविषयी जागरूकता वाढवणे आणि रक्तदानासारख्या जीवनदायी कार्याला प्रोत्साहन देणे हा होता. शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून अनेकांनी रक्तदान करून सामाजिक कर्तव्य पार पाडले.तसेच कामगार आणि स्थानिक रहिवाशांसाठी मोफत आरोग्य तपासणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. विविध आरोग्य तपासण्यांचा लाभ मोठ्या संख्येने नागरिकांनी घेतला.या उपक्रमात डेंीी परिवारातील सदस्य, ग्राहक आणि स्थानिक नागरिकांनी उत्साहाने सहभाग नोंदवला. आयोजकांनी सर्वांचे आभार मानत भविष्यातही अशा सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्याचा संकल्प व्यक्त केला.

# पुण्यातील बिल्डर बंधूंचा प्रताप, बंगल्यासमोरील गरिबांच्या हातगाड्या नकोशा, कोरेगाव पार्कमध्ये एका रात्रीत 'अख्खं गार्डन' उगवलं

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील कोरेगाव पार्क भागात एक चमत्कार घडला आहे. रस्त्याच्या कडेला रातोरात एक



गार्डन तयार झालं असून त्या गार्डनमध्ये रात्रीत मोठी झाडं आणि हिरवगार गवत देखील उगवून आले आहे. या चमत्काराची महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी दखल घेतली असून हे असं रातोरात गार्डन कसं तयार झालं याची माहिती घेतली जात आहे.

कोरेगाव पार्क मधील लेन नंबर तीनमध्ये अनेक बड्या उद्योगपतींचे बंगले आहेत. ज्यामध्ये बांधकाम व्यावसायिक अतुल चोरडिया आणि त्यांचे बंधू सागर चोरडिया यांच्या बंगल्याचाही समावेश आहे. गेल्या महिन्यात सागर चोरडिया यांच्या मुलीचे लग्न होते. अनेक व्हीआयपी त्यासाठी चोरडिया यांच्या बंगल्यात येणार होते. मात्र, कोरेगाव पार्कच्या या रस्त्यावर कष्टकऱ्यांची भुक भागवणारे चार हातगाड्या होत्या. अगदी कमी किंमतीत या ठिकाणी खाद्यपदार्थ विकले जात होते. या हातगाडी चालकांकडे महापालिकेचे लायसन्स होते आणि महापालिकेने तो भाग हॉकर झोन म्हणून जाहीर केल्याची पाटी देखील या ठिकाणी आहे. मात्र, चोरडिया यांच्या आलिशान घराकडे जाणाऱ्या रस्त्यावर या हातगाड्या डोळ्यांना खुपत असल्याने त्या हटवण्यात आल्या. त्या पुन्हा आपल्या जागी येऊ नयेत, यासाठी चोरडिया यांच्याकडून रातोरात रस्त्याच्या कडेला हे गार्डन उभारण्यात आले.

# कायदा हा आयुष्यभर शिकण्याचा प्रवास! सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती उज्ज्ञल भुयान यांचे प्रतिपादन

पुणे । प्रतिनिधी

**वकिली प्रतिष्ठेचा व्यवसाय असून त्यासाठी स्पष्टता, नैतिकता, शिस्त आणि सातत्याने शिकण्याची वृत्ती महत्त्वाची आहे. कायदा हा आयुष्यभर शिकण्याचा प्रवास आहे. समानता ही संविधानाची मूलभूत संकल्पना असून प्रत्येकाला सन्मानाने वागण्याचा अधिकार असल्याचे मत सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती उज्ज्ञल भुयान यांनी व्यक्त केले. नऱ्हे येथील जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटच्या ड. शार्दुलराव सुधाकरराव जाधवर लॉ कॉलेज आणि जाधवर लॉ कॉलेजच्या सहकार्याने आयोजित दुसऱ्या राष्ट्रीय जाधवर मूट कोर्ट स्पर्धेच्या समारोपावेळी ते बोलत होते.**



यावेळी मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती श्रीराम मोडक, पुण्याचे प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश महेंद्र महाजन, कौटुंबिक न्यायालयाचे प्रधान न्यायाधीश श्याम नागनाथराव रुकमे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र - कुलगुरू डॉ. पराग काळकर, संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुधाकर जाधवर, उपाध्यक्ष ड. शार्दूल जाधवर आदी उपस्थित होते. स्पर्धेत पुण्यातील एम.एम.एम.शंकरराव चव्हाण लॉ कॉलेजने विजेतेपद तर नाशिकमधील एनबीटी लॉ कॉलेजने उपविजेतेपद मिळवले.

भोपाळमधील रवींद्रनाथ टागोर विद्यापीठाला सर्वोत्कृष्ट मेमोरियल पुरस्कार मिळाला. देश्ना जैन (शंकरराव चव्हाण लॉ कॉलेज, पुणे) यांना अंतिम फेरीतील सर्वोत्कृष्ट वक्ता, विधी लुणावतला सर्वोत्कृष्ट संशोधक, तर रेहाना इक्बाल इमानीला प्राथमिक फेरीतील सर्वोत्कृष्ट वक्ता म्हणून गौरविण्यात आले. यावेळी जीवन गौरव पुरस्कार देऊन ज्येष्ठ विधीज्ञ सुधाकर आव्हाड यांचा सन्मान केला. स्पर्धेत देशभरातील २८ संघांनी सहभाग घेतला. ड. शार्दुल एस. जाधवर लिखित पुस्तकाचे प्रकाशन व वन मंथ कोर्स सर्टिफिकेटचे प्रकाशनही यावेळी झाले. मूट कोर्ट स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढण्यास, वकिली कौशल्ये विकसित होण्यास मदत होते, असे ड. शार्दुल जाधवर यांनी सांगितले. प्राचार्य डॉ. सुधाकर जाधवर यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे संयोजन डॉ. सपना देव यांनी केले.

# धो धो पावसाने पुणेकरांची दाणादाण.! तासाभरातच ८० ते १०० मिमी पावसाची नोंद

पुणे । प्रतिनिधी

मेघगर्जना आणि वादळी वाऱ्यासह शहर आणि उपनगरांत झालेल्या धो-धो पावसाने पुणेकरांची दाणादाण उडवली. एक ते दीड तास शहराच्या अनेक भागांत ८० ते १०० मिमी पावसाची नोंद झाली असून, ढगफुटीसदृश पावसामुळे रस्ते जलमय झाले. सोसायट्यांसह बैठी घरे, दुकाने आणि कार्यालयांमध्ये पाणी घुसल्यामुळे नागरिकांची तारांबळ उडाली. सायंकाळी साडेपाच वाजेपर्यंत खडकवासला परिसरात सर्वाधिक १०७ मिमी पावसाची नोंद झाली.



गुरुवार सकाळपासून शहरातील आकाश निरभ्र आणि उन्हाचा चटका जाणवत होता. दुपारी दोनच्या सुमारास आकाशात काळे ढग भरून आल्याने भर दुपारी शहरासह उपनगरांत अंधार पसरला.

क्षणात विजांचा कडकडाट आणि ३० ते ४० ताशी वादळी वाऱ्यासह धो-धो पावसाला सुरवात झाली. १०-१५ मिनिटे पाऊस पडेल त्यानंतर थांबेल, असे वाटत असताना पावसाचा जोर आणखी वाढला.

शिवाजीनगर, डेक्कन आणि पेठातील परिसरासह कोथरूड, खडकवासला, एनडीए, पाषाण, हवेली, वारजे, कात्रज, सिंहगड रस्ता, धायरी, औंध, हडपसर, कोरेगाव पार्क आणि लोहगाव परिसरात मुसळधार पाऊस झाला.

कमी कालावधीत पडलेल्या या जोरदार पावसामुळे ओढे-नाले ओसंडून वाहू लागले. रस्ते जलमय झाले, तसेच अनेक सखल भागांतील घरांमध्ये पाणी शिरले. त्यामुळे वाहने पाण्याखाली गेली आणि नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागला.

अनेक ठिकाणी दुचाकी वाहने पाण्यासोबत वाहून गेल्याच्या घटनाही समोर आल्या, तर झाडपडीच्या आणि पाणी साचण्याच्या तक्रारी वाढल्या असून, मदतकार्य सुरू आहे.

**महिलेचा दुर्दैवी मृत्यू...**

वादळी पावसामुळे शहरासह उपनगरांत झाडपडीच्या आणि होर्डिंग पडल्याच्या घटना घडल्या. त्यामध्ये सिंहगड रस्त्यावर होर्डिंगचा सांगाडा पडून घडलेल्या दुर्घटनेत एका महिलेचा मृत्यू झाला, तर झाडपडीच्या घटनेत दोन पादचारी जखमी झाले आहेत, तर अनेक वाहनांचे नुकसान झाले आहे.